संपादकीय

हताशेपोटी भटकती आत्मा ची आठवण

'चारसौ पार'चे टार्गेट घेऊन लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या व तिसऱ्यांदा सत्ताप्राप्तीचा कौल मागणाऱ्या भाजपला हे पक्के ज्ञात आहे की, मागच्या निवडणुकीत राज्यातील जनतेने भाजप–सेना युतीला जोरदार कौल दिल्याने भाजपची केंद्रातील स्पष्ट बहुमताची वाट सुकर झाली होती. मात्र, त्यानंतरच्या पाच वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

राहुल गांधी यांचा रायबरेलीतूनही अर्ज दाखल, तर अमेठीतून के एल शर्मा

नवी दिल्लीः अखेर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी स्व.इंदिरा गांधी यांचा मतदारसंघ असलेल्या रायबरेलीतून शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे आणि नेत्या सोनिया गांधी उपस्थित होत्या. दरम्यान, अमेठीतून के एल शर्मा काँग्रेसकडून निवडणूक लढविणार आहेत. राहुल गांधी यांनी तीनवेळा प्रतिनिधीत्व केलेल्या अमेठी लोकसभा मतदारसंघातून त्यांच्या २०१९ साली पराभव झाला. नेमक्या त्याचवेळी राहुल गांधी यांनी केरळमधील वायनाड येथूनही उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तेथील लोकसभा मतदारसघात राहुल गांधी विजयी झाले होते.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२३ शनिवार दि.४ मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

शेतकऱ्यांना 'डीबीटी'द्वारे चारा अनुदान मिळणार

पशुसंवर्धन विभागाचा प्रस्ताव, चारा पुरवठादारांकडून होणाऱ्या गैरव्यवहाराला बसणार लगाम

पुणे । प्रतिनिधी

राज्यात चारा टंचाई आणि त्यावरून होणाऱ्या गैरव्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने 'डीबीटी' (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) पद्धतीने चारा अनुदान देण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. या चारा अनुदान योजनेनुसार टॅगिंग केलेल्या जनावरांना 'डीबीटी'द्वारे चारा खरेदीसाठी अनुदान दिले जाणार आहे. यामुळे चारा पुरवठादारांकडून होणाऱ्या गैरव्यवहारावर लगाम घालता येणार असून, राज्यातील पशुपालकांना चारा अनुदानाचा थेट लाभ मिळणार असल्याचे पशुपालन विभागाने म्हटले आहे.

उन्हाळा सुरू होताच राज्यात चारा टंचाईची स्थिती निर्माण होणे, हे काही नवीन नाही. मात्र याचाच फायदा घेऊन काही चारा पुरवठादार गैरव्यवहार करतात. ते जास्त किंमतीत कमी प्रतीचा चारा विकतात. शिवाय, टँकर लॉबी सक्रिय होऊन चारा पुरवठ्यावर आपले वर्चस्व स्थापित करते. मात्र, आता या 'डीबीटी' योजनेमुळे चारा पुरवठ्यातील

◀◀ पान २ वर

चाऱ्याच्या योग्य वितरणासाठी नियोजन

'नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन' अंतर्गत टॅगिंग केलेल्या जनावरांचा डाटाबेस राज्य आणि केंद्र सरकारकडे उपलब्ध आहे. या डेटाबेसचा वापर करून 'डीबीटी' योजनेची अंमलबजावणी केली जाणार आहे. राज्यात चारा टंचाई टाळण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने शेतकऱ्यांना चारा निर्मितीसाठी बियाणे पुरवले होते. त्यातून २७ लाख ७१ हजार टन चारा उत्पादित झाला आहे. मात्र, हा चारा काही शेतकरी शेजारील राज्यात विकत आहेत. त्यामुळे, यंदा जिल्ह्याबाहेर चारा वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे. 'डीबीटी' योजनेमुळे राज्यातील चारा पुरवठा व्यवस्थेत सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. यामुळे पशुपालकांना चांगल्या दर्जाचा चारा योग्य किंमतीत मिळेल आणि चारा पुरवठ्यातील गैरप्रकारांवरही नियंत्रण येईल. असे पशुसंवर्धन विभागाने म्हटले आहे.

२२ जिल्ह्यांमध्ये होत आहेत गर्भलिंग निदान आणि गर्भपात

आरोग्य विभागाने व्यक्त केली चिंता

मुंबई । प्रतिनिधी

पुरोगामी राज्य अशी महाराष्ट्राची ओळख सांगितली जाते, महिलांना त्यांचे हक्क देणारे राज्य म्हणून ओळख आहे. पण समोर आलेली एक माहिती महाराष्ट्राला मान खाली घालायला लावणारी आहे. राज्यातील २२ जिल्ह्यांत मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या चिंता वाटावी एवढी कमी झालेली आहे. राज्यात बंदी असूनसुद्धा गर्भलिंगनिदान आणि गर्भपात जोरात सुरु असल्याचे हे निदर्शक आहे. राज्याच्या आरोग्य विभागाच्या पत्रातून ही चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

◀◀ पान २ वर

राज्यात मुलींचे गर्भपात होत असलेले जिल्हे आणि लिंग गुणोत्तरची स्थिती?

नाशिक : १ हजार मुलांमागे ८९७ मुली. यवतमाळ : १ हजार मुलांमागे ८९३ मुली. संभाजीनगर : १ हजार मुलांमागे ८८३ मुली. धुळे : १ हजार मुलांमागे ८८३ मुली. अहमदनगर : १ हजार मुलांमागे ८७९ मुली. धाराशिव : १ हजार मुलांमागे ८७४ मुली. सांगली : १ हजार मुलांमागे ८५७ मुली. जालना : १ हजार मुलांमागे ८५४ मुली. सिंधुदुर्ग : १ हजार मुलांमागे ९५० मुली. गोंदिया : १ हजार मुलांमागे ९४७ मुली. गडचिरोली : १ हजार मुलांमागे ९४० मुली. अमरावती : १ हजार मुलांमागे ९३० मुली. रायगड : १ हजार मुलांमागे ९२४ मुली. नागपूर : १ हजार मुलांमागे ९२३ मुली. लातूर : १ हजार मुलांमागे ९१८ मुली. नंदुरबार : १ हजार मुलांमागे ९१६ मुली. सोलापूर : १ हजार मुलांमागे ९११ मुली. रत्नागिरी : १ हजार मुलांमागे ९११ मुली. परभणी : १ हजार मुलांमागे ९१० मुली. नांदेड : १ हजार मुलांमागे ९०७ मुली. भंडारा : १ हजार मुलांमागे ९०५ मुली. अकोला : १ हजार मुलांमागे ९०२ मुली.

जिल्ह्यातील जनता खोट्या प्रचाराला बळी पडणार नाही–पंकजाताई मुंडे

बीडची सुज्ञ जनता पंकजाताईंच्या पाठिशी खंबीर–डॉ.योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

मी विकासाच्या मुद्यावर निवडणूकीचा प्रचार करत आहे. यापूर्वी पालकमंत्री असताना माझ्या विरोधात असलेल्या लोकांना कधीही मी त्रास दिला नाही, जातीपातीचे राजकारण कधीच केले नाही. विकास निधी सर्वांना दिला. कोणालाही दुखावले नाही. मात्र इतके सगळे चांगले असतानाही या निवडणूकीत काही जण जनतेचा बुध्दीभेद करु लागलेत, त्यांच्यापासून दूर रहा. विरोधक कोणताही मुद्दा नसल्याने आम्ही संविधान बदलणार अशी टिका आमच्यावर करत आहेत. बीड जिल्ह्यातील जनता सुज्ञ आहे ती विरोधकांच्या खोट्या प्रचाराला थारा देणार नाही. आम्ही सर्व समाजाचे आम्ही प्रतिनिधित्व करतो म्हणूनच मी विजयी होणार आहे, प्रत्येक कार्यकर्त्याने आपला बूथ सांभाळावा. डोळ्यात तेल घालून सतर्क राहून काम करावे. आपल्या मताचे सत्पात्री दान मला द्यावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी शुक्रवारी येथे केले. तर बीडची सुज्ञ जनता पंकजाताईंच्या पाठिशी खंबीरपणे उभी असल्याचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रवादीचे बीड विधानसभेचे नेते डॉ.योगेश व डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या वतीने आयोजित विजयी संकल्प कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. डॉ. योगेश क्षीरसागर,डॉ. सारिका क्षीरसागर,जनार्धन तुपे, प्रज्ञा खोसरे, कल्याण आखाडे, बाप्पासाहेब घुगे, सुनील झोडगे, सुधीर काकडे, भास्कर जाधव यांच्यासह नगर पालकेचे सभापती, नगरसेवक, विविध सेवा सहकारी सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या,मी पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी राष्ट्रीय महामार्गासह राज्य मार्गाचे कामे केली. यासह अनेक योजना राबवल्या, हे काम जनतेला दिसते.त्यामुळेच पाच वर्ष मी सत्तेसोबत नसतानाही माझी जनता माझ्यासोबत राहिली. ही निवडणूक बीड जिल्ह्याच्या विकासासाठी

◀◀ पान २ वर

आम्हाला पंकजाताईंना केंद्रात मंत्रीपदी पहायचयं–डॉ.सारिका क्षीरसागर

पंकजाताई आपल्या रूपाने ही लक्ष्मी बीड जिल्ह्यात यावी. आम्हाला सारे जण विचारतात की, तुम्ही खूप मनावर घेऊन प्रचार करतात, आम्ही सांगतो की, आम्हाला पंकजाताई यांना केंद्रात मंत्री म्हणून काम करताना पहायचे आहे, त्यामुळे आम्ही या निवडणुकीत ताईंसाठी १०० टक्के काम करणार आहो. पंकजाताई म्हणजे विश्वसनीय आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व आहेत. क्षीरसागर परिवार आणि मुंडे परिवारांचे नाते घट्ट राहिलेले आहे. तसेच सर्व कार्यकर्ते आज आपल्या परिवारात आहेत. हे सर्व कार्यकर्ते तळागाळातील आहेत. सामान्य माणसांशी यांची नाळ जुळलेली आहे त्यामुळे पंकजाताई यांचा या निवडणुकीत विजय निश्चित आहे.

केजरीवाल यांच्या अंतरिम जामिनावर ७ मे रोजी सुनावणी

नवी दिल्ली । वृतसंस्था

दिल्ली मद्य धोरण घोटाळ्यात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल १६ मार्चपर्यंत आरोपी नव्हते. मात्र, त्यानंतर ते या प्रकरणात आरोपी कसे झाले, या केजरीवाल यांच्या वकिलांनी विचारलेल्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने जोपर्यंत ईडीने अटक केली नव्हती तोपर्यंत अरविंद केजरीवाल यांना आरोपी मानले जाऊ शकत नसल्याचे सांगितले. या खटल्याची सुनावणी प्रदीर्घ काळ चालणार असल्याने अरविंद केजरीवाल दिल्लीतील लोकसभा निवडणुकीपूर्वी अंतरिम जामीन मिळण्यासाठी अर्ज करू शकतात, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

ईडीने केलेली अटक आणि रिमांडला आव्हान देण्यासाठी केजरीवाल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठापुढे सुनावणी सुरु आहे. या सुनावणीदरम्यान दिल्ली मद्य धोरण घोटाळ्यात अरविंद केजरीवाल हे १६ मार्चपर्यंत आरोपी नव्हते. मात्र, त्यांनतर अचानक काय झाले की, ईडीने त्यांना

◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड,दि.३ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू :२.०० क्विंटल	२,३०१	२,३०१	२,३०१
ज्वारी/हायब्रिड : १८६.५० क्विंटल	१,७००	३,४५०	२,३९२
मूग : ०.५० क्विंटल	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : ८.०० क्विंटल	७,४००	१०,४००	९,२००
उडीद : १.५० क्विंटल	५,०००	६,५०१	५,७५०
बाजरी: ६.५० क्विंटल	१,९५१	२,९९६	२,५१५
चिंच/लोकल: १४.०० क्विंटल	६,६००	६,६००	६,६००
सोयाबीन: ८.५० क्विंटल	४,५००	४,५००	४,५००
हरभरा: १०.०० क्विंटल	५,१००	५,७५१	५,६०६

राज्यातील मतदानाच्या टक्केवारीत वाढ नाही

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची स्पष्टोक्ती

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूकीसाठी २६ तारखेला दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पाडल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात झालेल्या मतदानाची टक्केवारी तब्बल ११ दिवसांनी जाहिर केली. त्यानंतर महाराष्ट्रासह देशभरातील प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या हेतूविषयी शंका उपस्थित करत मतदान प्रक्रियेबाबत शंका उपस्थित केली. यासंदर्भात महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोकलिंगम यांना मंत्रालय व विधिमंडळात आयोजित पत्रकार परिषदेत सवाल केला असता महाराष्ट्रात मतदानाच्या दिवशी रात्री जी आकडेवारी जाहिर करण्यात आली त्यात कोणताही बदल किंवा वाढ करण्यात आलेली नसल्याचे सांगितले.

यावेळी बोलताना एस चोकलिंगम म्हणाले की, महाराष्ट्रात दुसऱ्या टप्प्यात ८ लोकसभा मतदारसंघात झालेल्या मतदानाची टक्केवारी जी जाहिर करण्यात आली. ती आकडेवारी आजही तीच आहे. वास्तविक पाहता दिवसभर आणि संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करण्यासाठी जे लोक मतदान केंद्राच्या आवारात आले. त्या सर्वांचे मतदान पूर्ण झाल्यानंतर साधारणतः दिवसभरात अंदाजित मतदानाची टक्केवारी जारी करण्यात येते. दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत अंतिम आकडेवारी जाहिर करण्यात येत असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

एस चोकलिंगम पुढे म्हणाले की, अंदाजित आकडेवारी आणि अंतिम आकडेवारी यात सर्वसाधारणपणे १ ते ५ टक्के वाढीची शक्यता असते. २०१९ च्या तुलनेत झालेल्या मतदानाची आकडेवारी पाहिली तर महाराष्ट्रात मतदानाची टक्केवारीत वाढही झालेली नाही की त्यात घटही झालेली नाही. मागील लोकसभा निवडणूकीत

◀◀ पान २ वर

विकासात्मक नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांना सर्वाधीक मताने विजयी करा–आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या महायुती शासनाने मराठा समाजासाठी जाहीर केलेल्या विविध सवलती आणि मराठा समाजाला १० टक्के दिलेले आरक्षण हे टिकणारेच आहे.याबाबत भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी महायुतीचे सरकार वचनबद्ध असून मराठा समाजाने समाज माध्यमांवरील अफवा आणि तर्कवितर्क यांचा विचार न करता महायुतीच्या बीड लोकसभा निवडणुकीतील उमेदवार कर्तृत्ववान, विकासात्मक नेतृत्व असलेल्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले.

बीड लोकसभा निवडणुकीतील भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षांच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आयोजित पाटोदा

◀◀ पान २ वर

शुभ सकाळ...शुभ मतदान....

जिल्हाधिकाऱ्यांनी केले मतदान करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

आपल्या शरीराच्या बळकटीकरणासाठी जसे मॉर्निंग वॉक आवश्यक आहे, त्याप्रमाणे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान करने आवश्यक आहे. त्यामुळे मॉर्निंग वॉक करता करता मतदान केंद्रात जाऊन मतदान करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी शुक्रवारी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले, यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनातून स्वीप उपक्रमा अंतर्गत पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत मॉर्निंग वॉक झाल्यावर मतदान करूनच घरी जाऊया अशा संदेशाच्या पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. शहरातील प्रमुख मॉर्निंग वॉकच्या ठिकाणी बागेमध्ये, मैदानाच्या ठिकाणी हे पत्रक लावण्यात येणार आहेत. मतदानाचा दिवस सोमवार दि. १३ मे असून सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतची मतदानाची वेळ आहे.

पत्रकारांनी घेतली मतदान करण्याची शपथ

झालेल्या पत्रकार परिषदेत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी उपस्थित पत्रकारांना आम्ही भारतीय नागरिक लोकशाहीवर आमचा विश्वास असल्याने आमच्या निवडणुकांचा दर्जा उचलून धरू. कोणत्याही अमिषाला बळी न पडता मतदान करू, मतदान करू अशी प्रतिज्ञा घेत आहोत. अशी मतदान जागरुकतेची शपथ दिली. यावेळी बीड जिल्ह्यातील प्रमुख दैनिकांचे पत्रकार उपस्थित होते.

अग्रलेख

हताशेपोटी भटकती आत्मा ची आठवण

'चारसौ पार'चे टार्गेट घेऊन लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या व तिसऱ्यांदा सत्ताप्राप्तीचा कौल मागणाऱ्या भाजपला हे पक्के ज्ञात आहे की, मागच्या निवडणुकीत राज्यातील जनतेने भाजप-सेना युतीला जोरदार कौल दिल्याने भाजपची केंद्रातील स्पष्ट बहुमताची वाट सुकर झाली होती. मात्र, त्यानंतरच्या पाच वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवार यांच्या पुढाकाराने घडलेल्या महाविकास आघाडीच्या प्रयोगाने सर्वांत जास्त जागा जिंकलेल्या असतानाही भाजपला विरोधी पक्षाच्या बाकावर बसावे लागले. हा प्रकार भाजपची अजेय जोडी मानल्या जाणाऱ्या मोदी-शहा यांच्या जिव्हारी लागणाराच होता.

उद्धव ठाकरे यांची शिवसेना फोडून भाजपने महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवरून खाली खेचले व एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करून सरकार स्थापन करत उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदासाठीचा 'अतृप्त आत्मा' ठरवण्याचा प्रयत्न केला. मात्र, घडले उलटेच. जनतेची उद्धव ठाकरेंनाच सहानुभूती मिळाली व महाविकास आघाडी विस्कळीत होण्याऐवजी आणखी एकसंध झाली. हे आव्हान मोडून काढण्यासाठी मग शरद पवारांच्या राष्ट्रवादीलाही खिंडार पाडण्याचा प्रयोग झाला. अजितदादा आपल्या शिलेदारांसह भाजपच्या छावणीत दाखल झाले. मूळ पक्ष कुणाचा? याचा जो प्रयोग शिवसेनेबाबत घडविला गेला तोच राष्ट्रवादी कॉँग्रेसबाबत घडविण्यात आला. या सगळ्या प्रयोगानंतर खरे तर भाजपची लोकसभेसाठीची महाराष्ट्रातील वाट निर्धोक व्हायला हवी होती. मात्र, ना शरद पवार डगमगले ना उद्धव ठाकरे सैरभैर झाले. उलट या दोघांनी त्वेषाने आपली पक्षबांधणी सुरू केली आणि महाविकास आघाडीचे ऐक्य कायम ठेवले. हे पाहून भाजपने कॉँग्रेसच्या राज्यातील काही नेत्यांनाही आपल्या गळाला लावले. मात्र, तरीही भाजपची लोकसभेसाठीची वाट निर्धोक होत नाहीच. त्यामुळे भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांनी महाराष्ट्रात सभांचा धडाका लावला आहे. स्वत: पंतप्रधान मोदी यांनी तिसऱ्या टप्प्यात मतदान होऊ घातलेल्या मतदारसंघांमध्ये नुकताच दोन दिवसांत सहा सभांचा धडाका उडवून दिला व वातावरणनिर्मितीचा प्रयत्न केला. याच धडाक्यातील पुण्याच्या सभेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका करताना पंतप्रधानांनी त्यांना 'भटकती आत्मा' ठरवले. शरद पवारांनी राज्यात पुलोद सरकारचा प्रयोग केल्यापासून महाराष्ट्रात राजकीय अस्वस्थता निर्माण झाल्याची पुस्ती त्यांनी जोडली. अर्थातच त्यावरून राजकीय वादळ निर्माण होणे अपरिहार्यच. स्वत: शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडीत सामील असणाऱ्या सर्वच पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी मोदींना जोरदार प्रत्युत्तरही दिले. देशातील शेतकऱ्यांसाठी माझा आत्मा अस्वस्थ आहे, या शब्दांत शरद पवारांनी मोदींना जोरदार प्रत्युत्तर दिले तर मोदी हेच सत्तेसाठीचे अतृप्त आत्मा असल्याची टीका संजय राऊत यांनी केली. शरद पवार देशाचा आत्मा असल्याचे जयंत पाटील यांनी मोदींना सुनावले.

'भटकती आत्मा' मोदी नेमके कुणाला म्हणाले हे मी पुढच्या सभेत त्यांना नक्की विचारेन, अशी सारवासारव अजित पवार यांनी केली. या सगळ्या प्रतिक्रिया अपेक्षितच. हे वादंग आता लोकसभा निवडणूक प्रचार संपेपर्यंत व त्यानंतरही सुरू राहणे अटळच. मात्र, विकसित भारताचा संकल्प करून व स्वत: विकासाचा युगपुरुष असल्याची प्रतिमा निर्माण करून तिसऱ्यांदा सत्ता मागणाऱ्या मोदींना महाराष्ट्रातील प्रचारात स्वत:च्या सरकारच्या कामांवर भर देण्यापेक्षा 'भटकती आत्मा' का आठवली असावी हा मूळ प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्रात मागच्या पाच वर्षांत घडलेला जो राजकीय घटनाक्रम घडवून आणला त्यात दडले आहे. सगळे प्रयत्न करूनही महाविकास आघाडीला महाराष्ट्रात रोखण्यात अपयशच येत असल्याच्या हताशेपोटी मोदींना 'भटकती आत्मा'ची आठवण झालेली दिसते. मात्र, अशा वाईट आठवणी आठवल्या तरी त्यावर जाहीर सभांमध्ये हताशेने नव्हे तर संयमाने व्यक्त व्हायचे असते हे शहाणपण काही मोदी दाखवू शकले नाहीत आणि त्यातूनच पवारांना भटकती आत्मा संबोधून त्यांनी स्वत:चे व स्वत:च्या पक्षाचे भरकटलेपणच दाखवून दिले आहे.

औराद्चा पारा ४४ अंश सेल्सिअसवर

निलंगा । प्रतिनिधी

तालुक्यातील औराद शहाजानी येथील तापमानामध्ये उच्चं की वाढ होऊन दिनांक ३ मे रोजी तापमान ४४ अंश झाल्याने गर्मीने नागरिकांचा जीव असावी झाला आहे वाढत्या तापमानामुळे नागरिक थंड पेयाकडे वळले आहेत . तर औरादचा तेरणा व मांजरा काट तापल्याने उकाड्यामुळे नागरिकांच्या अंगाची लाही लाही होत आहे.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी हे शहर तेरणा व मांजरा नदीच्या मशीत वाढले आहे . यामुळे औरादसह परिसरातील नागरिकांना थंडीमध्ये कडाक्याची थंडी व उन्हाळ्यामध्ये उच्चांकी तापमानाला तोंड द्यावे लागते . गेल्या तीन दिवसापासून तापमानामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे दि १ मे रोजी ४२.५ अंश सेल्सिअस तर दि २ मे रोजी ४३ अंश सेल्सिअस व आज दि ३ मे रोजी ४४ अंश सेल्सिअस तापमान झाल्याने औरादसह परिसर तापला आहे. वाढत्या तापमानामुळे आबाल वृद्ध लहान मुले व नागरिकांचा जीव कासावीस होत आहे उकाड्यामुळे नागरिक दुपारच्या वेळी सावलीचा आसऱ्याचा आसरा घेत घराच्या बाहेर पडत नसल्याने दुपारच्या वेळी रस्त्यावर शुकशुकाट दिसत आहे. गर्मी पासून सुटकारा मिळण्याकरिता नागरिकांचा थंडपयाकडे कल वळल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे गरिबाचा फ्रिज माठ , छत्री , गमच्या , टोपी , कुलर आदी खरेदी कडे तोंडा वाढला आहे .गेल्या तीन दिवसापासून तापमानात वाढ होऊन आज औराद शहाजानी येथील हवामान केंद्रावर ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असल्याचे हवामान मापक मुक्रम नाईकवाडे यांनी एकमतशी बोलताना सांगितले.

न्यू व्हीजन पब्लिक स्कूलच्या 'व्हिजन समर कॅम्प' ला मोठ्या उत्साहात सुरुवात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू व्हिजन पब्लिक स्कुल येथे ''व्हिजन समर कॅम्प''ची मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. या समर कॅम्पचा उद्घाटिका म्हणून डॉ मनीषा विश्वजित पवार या उपस्थित होत्या. तसेच संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, मार्गदर्शक प्रा.डॉ डी एच थोरात, प्रा. वसंतराव चव्हाण, प्राचार्य रेंजो आर चंद्रन , श्रीमती सविता बनाळे, परेन्ट्स व टीचर्स असोसिएशनचे सदस्य देखील यावेळी उपस्थित होते.

शुक्रवार दिनांक ३ मे २०२४ रोजी न्यू व्हीजन पब्लिक स्कूल अंबाजोगाई येथे व्हिजन समर कॅम्प उत्साहात सुरू झाला. या समर कॅम्पची सुरुवात प्रमूख अतिथींच्या हस्ते विद्येची देवता माता सरस्वतीचे पूजन करून कॅम्पचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर शालेय संगीत समूहाने 'दया कर दान विद्या का ' ही प्रार्थना अतिशय सुरेल आवाजात सादर करण्यात आली. मुलांना संस्कारांची शिकवण देण्यासाठी श्लोकांचे पठण देखील केले गेले .समर कॅम्पच्या नियमित आयोजनामुळे विद्यार्थ्यांच्या मध्ये शाळेची ओढ व गोडी निर्माण होते यासाठीच अशा समर कॅम्पचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात यावे अशी मागणीही याप्रसंगी डॉ मनीषा विश्वजित पवार यांनी केली. व्हिजन समर कॅम्पमध्ये वेगवेगळे प्रात्यक्षिक घेण्यात येणार आहेत. त्याचबरोबर वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रसंगावधान कसे ठेवावे याबाबत वेगवेगळी प्रात्यक्षिके दाखविण्यात आली.विविध योगासने व योगासनांचे प्रकार व त्यांचे आपल्या दैनंदिन जीवनातील महत्व पटवून देण्यात आले.

मुलांमध्ये आनंद आणि उत्सुकता कायम ठेवण्यासाठी मनोरंजक नृत्य (चिकन डान्स) सादर केले गेले. या कॅम्पमध्ये १६० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. व्हिजन समर कॅम्प हा १० मे २०२४ पर्यंत सुरू राहणार असून यातील पुढील दिवसांत मल्लखांब ,कुंभार काम , पक्षी निरीक्षण , घोडेस्वारी , म्युझिकल रेन डान्स , मडी मार्वल , निंजा वॉरियर यांसारखे उपक्रम होणार आहेत. या कॅम्पमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत टी शर्ट , आयडी व बस ची सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहेत . या समर कॅम्पचे विशेष आकर्षण म्हणजे १० मे रोजी 'कोन बनेगा समर चॅम्प ' चे आयोजन केले आहे. यातून प्रतिभावंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीस मिळवण्यासाठी एक व्यासपीठ मिळणार आहे. यात मुलांसाठी वेगवेगळ्या गटांमध्ये रोज विविध स्पर्धा होऊन अंतिम फेरीत जाऊन प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना भरघोस बक्षिसे दिली जाणार आहेत. या व्हिजन समर कॅम्पसाठी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्रा. वसंतराव चव्हाण, प्रा डॉ. डी. एच. थोरात, प्रा.सुरेश बिराजदार, प्राचार्य रेंजू आर चंद्रन यांनी या कॅम्पला व सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान येथे प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचे आयोजन

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र ही संतांची भूमी असुन महाराष्ट्रातील परंपरेने चालत आलेल्या सर्व साधूसंतांनी विश्वमांगल्यासाठी यशस्वी प्रयत्न केले आहेत.याच व्यापक आणि उदात्त संत परंपरेचा मागोवा घेत ही परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी वडवणी तालुक्यातील बालाघाट डोंगररांगाच्या कुशीत उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प (वेदांत सागर)च्या काठावर आणि ब्रह्मगिरी पर्वताच्या पायथ्याशी गत चार वर्षांपूर्वी ह.भ.प.आचार्य श्री.विठ्ठल महाराज शास्त्रीजी यांनी श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान वेदांतनगरची संस्थापना केली. अत्यंत दुर्लक्षित,दुर्गम आणि खडतर परिसरातील त्यांचा हा विश्वमांगल्याचा प्रवास सोप्पा नसतांना सुद्धा अनेक संकटांवरती मात करत त्यांनी तो व्यवस्थित पुढे चालु ठेवला. त्याचाच एक प्रत्यय म्हणून यावर्षी श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान येथे संकल्पपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वर (शिवलिंग)चा भव्य प्राणप्रतिष्ठा महोत्सव साजरा होतो आहे.

ह.भ.प.आचार्य श्री.विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान वेदांतनगर येथे गत चार वर्षांमध्ये लोकोपयोगी अनेक दिव्य सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.त्यामध्ये बालसुसंस्कार शिबीर, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, अन्नदान, वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून विविध व्याख्यात्यांची व्याख्याने आणि कीर्तन महोत्सव आदि यशस्वीपणे पार पडले आहेत. यावर्षी संकल्पपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वराचा प्राणप्रतिष्ठा महोत्सव आयोजित केला असुन मराठवाड्यातील दिग्गज साधुसंताच्या हस्ते ही संकल्पपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वराची प्राणप्रतिष्ठा होणार असून या निमित्त दिव्य शिवलिलामृत पारायण आणि त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून संकल्पपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वर भक्त आणि समस्त शिवभक्तांनी या उत्सवात सहभागी होऊन भगवान श्री निळकंठेश्वराच्या आशिर्वादास पात्र ठरावे असे संस्थानचे सर्वेसर्वा प्रमुख आचार्य श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांनी विनम्र आवाहन केले आहे.

राजे धर्माजी गड येथे साधू संतांच्या हस्ते मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

पिंपळवंडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील हातोला (खलाटवाडी) डोंगरमाथ्यावर अत्यंत दुर्लक्षित,दुर्गम आणि खडतर परिसरातील ऐतिहासिक वारसा असलेल्या राजे धर्माजी गडाच्या उद्धारासाठी ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री(भागवत भास्कर)गेल्या तीन वर्षापासून अहोरात्र परिश्रम घेत आहेत.त्यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली यावर्षी प्रथमच दि.२९ एप्रिल ते ६ मे २०२४ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला आहे.या सप्ताह सोहळ्याला पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या संख्येने येऊन लाभ घेत आहेत.या ठिकाणी भव्य मंदिर उभारले असून दि.१ मे २०२४ (बुधवार) रोजी पंचकुंडी महायज्ञ संपन्न होऊन याप्रसंगी येथे श्री गणेश,श्री हनुमंत राया,श्री कृष्ण राधा तसेच श्री.संत भगवानबाबा,श्री.संत वामनभाऊ

महाराज आदि देवतांच्या व साधुसंतांच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा देव ब्राह्मणांच्या साक्षीने धार्मिक विधीने व संत महंतांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी ह.भ.प.महंत विठ्ठल महाराज (श्री.क्षेत्र गहिनीनाथ गड),ह.भ.प.सुदर्शन महाराज(पाटण सांगवी),ह.भ.प. महामंडलेश्वर त्रिविक्रमानंद शास्त्री(इंदू वासिनी संस्थान पिंपळनेर),ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री(तारकेश्वर गड),ह.भ.प.बाबासाहेब महाराज (केशवराज संस्थान वारणी),ह.भ.प. रामकृष्ण महाराज (विठ्ठलगड पांगरा),ह.भ.प.अभिमन्यू महाराज खाडे(हनुमान गड),ह.भ.प.एकनाथ महाराज केदार(शिरूर),ह.भ.प.राम महाराज शास्त्री(आळंदी),एकनाथ महाराज शास्त्री,ऋषिकेश महाराज,ह. भ.प.काशिनाथ महाराज(गणेश गड संस्थान नागतळा),ह.भ.प.प्रकाश दाणी महाराज आदिसह पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री क्षेत्र राजे धर्माजी गड येथे जाण्यासाठी हातोला गावापासून सिमेंट रस्ता,गडावर सभामंडप भविक -भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे महत्त्वाचे आहे.यासाठी संबंधित लोकप्रतिनिधींनी ही गैरसोय दूर करून राजे धर्माजी गडाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून द्यावा,अशी भाविक-भक्तांकडून मागणी होत आहे.

खोट्या आश्वासनास मतदारांनी बळी पडू नये-सिताराम क्षिरसागर

माजलगांव । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षात काहीच न केलेले भाजपा उमेदवार सध्या जनतेस खोटे आश्वासने देवून मतदान मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. या आश्वासनास बळी न पडता महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना विजयी करा असे आवाहन राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाचे सामाजिक न्याय सेलचे जिल्हा उपाध्यक्ष सिताराम क्षिरसागर यांनी खानापुर येथे कॉर्नर बैठकीत केले.

या बैठकीत पुढे बोलताना ते म्हणाले भाजपच्या लोकसभेच्या उमेदवार माजी मंत्री पंकाजाताई मुंडे एका मुलाखतीत म्हणतात जिल्ह्यात दहा हजार नोकऱ्या उपलब्ध होतील असा उद्योग मी या जिल्ह्यात उभारणार आहे. तसेच बार्शी येथे असलेल्या कॅन्सर हॉस्पिटलच्या धर्तीवर जिल्ह्यात हॉस्पीटल उभारणार आहे. तसेच शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्य उपस्थितीवर लक्ष देण्याचा प्रयत्न करणार आहे. गेले दहा वर्षे यांच्याच घरात खासदारकी आहे. यामध्ये साधा खासदार फंड जिल्ह्यात वाटप केला नाही. आशिया खंडातील काह कारखान्यात गणना होणारा वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना चालविता आला नाही तो बंद पडला. त्यातील शेकडो कर्मचारी आज उपासमारी सहन करीत आहेत आणि आज मतदारा भुलविण्यासाठी दहा हजार नोकऱ्या उपलब्ध करण्याची भाषा बोलत आहेत ही न पटण्यासास बाब असून आधि त्यांनी कारखाना सुरु करून कर्मचाऱ्यांची उपासमार थांबवावी त शेतकऱ्यांना ऊसाची उर्वरीत रक्कम देण्याची व्यवस्था करावी. मगच आगामी काळात करणार याच्या गप्पा माराव्यात असे ते म्हणाले. जनता आता हुशार झाली असून प्रत्येक उमेदवारांच्या कार्याचा आढावा ते घेत अस महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी जि.प. मध्ये सभापती अ अनेक समाज उपयोगी कामे केले आहेत. तसेच अत्यंत कष्टातून त्यांनी कारखाना उभ तो व्यवस्थीत चालवित आहेत. शेकडो बेरोजगार युवकांना नोकऱ्या दिल्या आहेत. येत्या लोकसभा निवडणुकीत बजरंग बप्पा सोनवणे यांनाच मतदान करण्याचे आवहान या बैठकीत क्षिरसागर यांनी केले. या बैठकीस बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पत्नी सौ.सारीका सोनवणे तसेच दत्ता कांबळे, अंजली तौर, संगिता क्षिरसागर यांच्यासह बहुसंख्य पुरुष उपस्थित होते.

पान १वरून...

शेतकऱ्यांना 'डीबीटी'द्वारे

गैरप्रकारांवर नियंत्रण येईल आणि पशुपालकांना थेट लाभ मिळेल. या योजनेनुसार, टॅगिंग केलेल्या जनावरांच्या मालकांना 'डीबीटी'द्वारे चारा खरेदीसाठी अनुदान दिले जाईल. यासाठी संबंधित पशुपालकांना रीतसर अर्ज करावा लागेल आणि पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून त्यांची पडताळणी केली जाईल. त्यानंतर शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे.

जिल्ह्यातील जनता खोट्या प्रचाराला

आहे, सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी आहे. सन्मानाचा विजय मिळवून देण्यासाठी तुमचे योगदान या निवडणुकीत मला द्या. आपला विकासाचा विचार गावागावात पोहचला आहे. लोक आता मतदानासाठी उत्साहित आहेत. आजपर्यंतच्या राजकारणात आम्ही कधी कुणाचा द्वेष केला नाही, विकास आणि आपल्या जिल्ह्यातील सर्व समाज घटकांच्या हितासाठी काम केलं आहे. जिल्ह्यात मी ठिकठिकाणी मतदारांना मते मागत असताना त्यांचा प्रतिसाद उत्स्फूर्त आहे. साडेतीन खासदारांच्या मागे उभे राहायचे की ३५० पेक्षा जास्त खासदार निवडून येणार्या पक्षासोबत रहायचे हे जनतेला चांगले कळते. मुंडे साहेबाचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्याला येत्या ४ तारखेला विजयी सभा घ्यायची आहे. निवडणूक ही देशाची आहे. देशाचे नेतृत्व पुन्हा एकदा लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्याकडे जाणार आहे, त्यामुळे या निवडणुकीत आपल्या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास समोर ठेवून मतदारांनी इतर कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता भाजपला मतदान करावे. तुमच्या गावात तुमची किती मते आहेत हे या निवडणुकीत दाखवून देण्याची संधी कार्यकर्त्यांना आहे. जातीपातीचे राजकारण करणार्यापासून दूर रहा. मला प्रचंड मतांनी विजयी करून दिल्लीला पाठवा असे आवाहन केले. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मताधिक्य वाढवण्यासाठी बूथ मजबूत करण्याचे काम करावे, लवकरच मोदींजींची बीडला सभा होत आहे.या सभेला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन त्यांनी केले.

धनंजय मुंडे

जिल्हयात सात लाख हेक्टर जमीन कोरडवाहू आहे ही सर्व जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी आपण पंकजाताई याना विजयी करा. महायुती म्हणून आम्ही सर्वजण एकदिलाने काम करत आहोत. जिल्ह्यात विकासाचे, सिंचनाचे अनेक प्रकल्प राबवत आहोत, राजकारणात मी सक्रिय झालो तेव्हा बीड जिल्ह्यात कधीच जातपात नव्हती. सर्व जातीचे लोक बीडमधून खासदार झाले, हा बीड जिल्ह्याचा सर्वधर्मसमभावाचा राजकीय इतिहास आहे. इथे जात पाहून नव्हे तर व्यक्तीचे कर्तृत्व पाहून उमेदवाराला निवडून देणारी जनता आहे. कोणी कोणाच्या जातीत जन्माला यावं हे आपल्या हातात नसत. त्यामुळे जातिवादाला महत्व देऊ नका. देश विकासासोबत जिल्ह्याचा विकास करण्यासाठी ही निवडणूक आहे. पंकजाताई मुंडे यांना खासदार म्हणून मोदींजींच्या पाठीशी उभे करा.

डॉ.योगेश क्षीरसागर

आम्ही सर्वांनी मनावर घेतले आहे, पंकजाताई यांचा विजय निश्चित आहे. लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या हाती देशाचे हित आहे आणि त्यांचे हात मजबूत करण्यासाठी आपल्याला पंकजाताई मुंडे यांना निवडून आणायचे आहे.मोदींजींनी पंकजाताई मुंडे यांना केवळ खासदार करण्यासाठी उमेदवारी दिली नाही तर त्यांना केंद्रात मंत्रिपद मिळणार आहे त्यामुळे बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पंकजाताई यांना विक्रमी मतांनी विजयी करायचे आहे. पालकमंत्री असताना पंकजाताई यांनी ग्रामीण रस्ते तसेंच इतर विकासाच्या योजना बीड जिल्ह्यात आणल्या,त्यांच्या कार्यकाळात बीड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांची विकास कामे झाली हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात आताही बीड जिल्ह्यात विकास कामाचा वेग कायम आहे, समोरच्या उमेदवाराचे कोणतेही काम नाही,त्यामुळे ते काय काम करणार हे दिसून येते. आपला विकास कोण करू शकते हे बीडच्या जनतेला चांगले कळत म्हणूनच पंकजाताई मुंडे यांना विजयी करायचे आहे. पंकताईंनी कधीही जातीभेद केला नाही. त्यामुळे बीडची जनता येत्या १३ तारखेला पंकजाताई यांना विक्रमी मतदान करेल आणि ४ जून रोजी पंकजाताई मुंडे या प्रचंड मतांनी विजयी झालेल्या असतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विकासात्मक नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे

तालुक्यातील अंमळनेर जिल्हा परिषद गटामधील मुगगाव, अंतापूर, निवड्ढा, वाहली, लांबरवाडी, सुप्पा,कुसळंब, धोपटवाडी, जरेवाडी, सरदवाडी, पिंपळवंडी, आंबेवाडी, चंद्रेवाडी, अंमळनेर, कोतन, गंगावाडी, पांढरवाडी, सकुंडवाडी या गावांमध्ये कॉर्नर बैठकांमध्ये ते बोलत होते. ते आ.धस पुढे म्हणाले, सध्याच्या महायुतीच्या राज्य शासनाने मराठा समाजाला अनेक सवलती जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये उच्च शिक्षणासाठी शाहू महाराज शिष्यवृत्ती, पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना, सारथी योजना या योजनांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होत असून मोठ्या प्रमाणावर मराठा कुणबी जात प्रमाणपत्र वाटप केली आहेत. तसेच मराठा समाजाला सामाजिक,शैक्षणिक, मागासप्रवर्ग म्हणून १० टक्के दिलेले आरक्षण हे न्यायालयामध्ये टिकेल अशाच पद्धतीने कोणताही भेदभाव न करता त्रुटींची पूर्तता करून सादर केलेले आहे. त्यामुळे दिलेले आरक्षण टिकणारच आहे. परंतु याबाबत ग्रामीण भागामध्ये समाज माध्यमांमध्ये अफवा पसरवून समाजासमाजामध्ये गैरसमज पसरवले जात आहेत. याबाबत मराठा समाजातील सुजाण आणि जागरूक नागरिकांनी सकारात्मक विचार करून भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव देशपातळीवर सर्वांशी परिचित असलेल्या माजी ग्रामविकास मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी राज्याचे ग्रामीण विकास मंत्री असताना संपूर्ण जिल्ह्यात गाव, वाड्या, वस्त्या येथे चांगले रस्ते निर्माण केले आहेत तसेच जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाचे अनेक कामे त्याचबरोबर असंख्य ग्राम सचिव भवन,ग्रामपंचायत इमारती बांधकामे,घरकुले केली आहेत, नगर- बीड -परळी हा रेल्वे मार्ग लवकरात लवकर पूर्ण करावयाचा आहे. त्यामुळे अशा विकासात्मक नेतृत्व असलेल्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना लोकसभेत प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहनही त्यांनी केले. अंमळनेर जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच गटातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटी चेअरमन, आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील मतदानाच्या

जितके मतदान झाले त्याच प्रमाणात मतदान झाले. तितकेच मतदान पहिल्या दोन टप्प्यात झाले असल्याचेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले. यावेळी काही प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत विचारले असता एस चोकलिंगम म्हणाले की, मी महाराष्ट्रापुरता निवडणूक मुख्यधिकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या अनुषंगाने आपण प्रश्न विचारले तर बरे राहिल. आपल्या राज्यात मागील वेळी इतके मतदान होण्यात आपण भूमिका बजावली आहे. मात्र इतर राज्यात गतवेळच्या तुलनेत कमी मतदान झाले आहे, तसेच वाढत्या उन्हामुळेही मतदान कमी झाल्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील तीन टप्प्यात मतदानाची आकडेवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही यावेळी त्यांनी सांगितले.

केजरीवाल यांच्या अंतरिम

आरोपी मानले, अशी विचारणा केजरीवाल यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी केली. केजरीवाल यांना पीएमएलए कायद्याच्या कलम ५० अंतर्गत ईडीने समन्स पाठविले होते, पण त्यांच्याविरोधात सबळ पुरावे गोळा करून आरोप निश्चित केले जाईपर्यंत त्यांना आरोपी मानले जाऊ शकत नाही. केजरीवाल यांना शेवटचे समन्स १६ मार्चला पाठविण्यात आले होते. २१ मार्च रोजी त्यांना ईडीपुढे हजर रहायला सांगितले होते. यावरून ते आरोपी मानले जाऊ शकत नाही, असा युक्तिवाद ॲड. सिंघवी यांनी केला. त्यावर न्यायालयाने सिंघवी यांना सांगितले की, केजरीवाल यांना २१ मार्च रोजी अटक करण्यात आली होती. त्यामुळे जोपर्यंत अटक केली जात नाही, तोपर्यंत केजरीवाल यांना आरोपी मानले जाऊ शकत नाही.

----

२२ जिल्ह्यांमध्ये होत आहेत

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्भलिंग निदान आणि मुलींचे गर्भपात होत असल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी एका पत्रात याबाबत माहिती नमूद केली आहे. त्यामुळे २२ जिल्ह्यांमध्ये लिंग गुणोत्तरचे प्रमाण म्हणजे एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण चिंतादायकरीत्या घटल्याचे समोर आले आहे. जालन्यात सर्वाधिक मुलींचे प्रमाण कमी झाल्याने चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

cmyk

हसन पटेल यांना पत्नीशोक

बीड :- तालुक्यातील नागापूर खुर्द येथील पोलीस पाटील हसन पटेल यांच्या पत्नी खातुनबी हसन खा पठाण यांचे शुक्रवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.मृत्युसमयी त्याचे वय ८०वर्षे होते.त्यांच्यावर शुक्रवारी रात्री १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

जुन्या पिढीचे नागापूर खुर्द येथील पोलीस पाटील हसन खान मोहम्मद खान पठाण यांच्या पत्नी खातुनाबी हसन खान पठाण यांना शुक्रवारी हृदयविकाराचा झटका आला उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. त्यांच्यावर राहत्या गावी रात्री दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते. या निधना बद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत असून त्यांच्या पश्चात तीन मुले अलीम खान, हरून खान करीम खान आणि एक मुलगी , पुतणे,सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे आयुष्यभर शेतकरी कुटुंबात एकत्र कुटूंब ठेवून सर्वांना बरोबर घेऊन चालणारी आई म्हणून त्यांचा नावलौकिक होता. या दुःखद घटने बद्दल मराठी पत्रकार परिषद आणि दैनिक राज्य लोकतंत्राच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.पटेल परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र सहभागी आहे.

दैनिक
राज्य
लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. ४ मे २०२४

पत्नी नोकरी करत असल्याचा राग पतीने पत्नीला चाकूने भोसकले

‘बायकोचे काम केलंय, आता तुझा नंबर..’, स्वतःच्या बहिणीलाही दिली धमकी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पत्नी बाहेर नोकरी करत असल्याने आणि घटस्फोटाची तक्रार दिल्याच्या रागातून दारुड्या पतीने पत्नीच्या पोटात चाकूने भोसकले. या प्राणघातक हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली असून तिची मृत्यूशी झुंज सुरु आहे. हि खळबळजनक घटना अंबाजोगाई शहरातील अंबिका कॉलनीत सोमवारी (दि.३०) रात्री घडली.

भाग्यश्री मयूर शर्मा (वय ३८, रा. अंबाजोगाई) असे त्या जखमी पत्नीचे नाव आहे. बारा वर्षापूर्वी भाग्यश्रीने घरच्यांचा विरोध झुगारून मयूर बाबूलाल शर्मा (सध्या रा. छत्रपती चौक, अंबाजोगाई) याच्यासोबत आंतरजातीय प्रेमविवाह केला होता. मयूरची बहिण कोमल पंचारिया यांच्या फिर्यादीनुसार, मागील सहा वर्षापासून मयूर दारूच्या आहारी गेला आहे. त्यामुळे मयूरचा पत्नी भाग्यश्री आणि आई-वडिलांसोबत सतत वाद होत होता. त्यातच भाग्यश्री बाहेर नोकरी करू लागल्याने त्याच तिच्यावर राग असायचा. मागील वर्षभरापासून ती एका खाजगी रुग्णालयात नोकरी करत होती. मयूरच्या त्रासाला कंटाळून भाग्यश्री काही दिवसापासून ‘मानवलोक’ संस्थेच्या मनस्विनी प्रकल्पात राहत होती आणि तिथूनच तिने मयूर विरुद्ध घटस्फोटाची तक्रार दिली होती. सोमवारी रात्री ८ वाज्ताछ्या सुमारास मयुरने भाग्यश्रीला रुग्णालयाच्या बाहेर बोलावले आणि ते दोघे अंबिका कॉलनीतील हनुमान मंदिराकडे गेले. तिथे मंदिरासमोर मयूरने सोबत आणलेला चाकू बाहेर काढून जीवे मारण्याच्या उद्देशाने भाग्यश्रीच्या पोटात भोसकले आणि निघून गेला. हा वार एवढा भयंकर होता कि भाग्यश्रीच्या पोटातील आतडी बाहेर आली. भाग्यश्री काम करत असलेल्या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी तिला जखमी अवस्थेत तातडीने स्वाराती रुग्णालयात दाखल केले. तिथे भाग्यश्रीवर तत्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली असून अद्यापही तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. याप्रकरणी कोमल पंचारिया यांच्या फिर्यादीवरून मयूर शर्मा याचाय्वर अंबाजोगाई शहर ठाण्यात कलम ३०७ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. पुढील तपास एपीआय जाधवर करत आहेत. दरम्यान, हल्ला करून मयूर शर्मा फरार झाला असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत.

बहिणीलाही दिली जीवे मारण्याची धमकी

केवळ पत्नीवरच प्राणघातक हल्ला करून मयूर थांबला नाही. त्यानंतर त्याने बहिण कोमल यांना कॉल केला आणि ‘मी तिचे काम केलंय, आता तुझा नंबर आहे, मी तुला दाखवतो’ अशी धमकी दिली. त्यानंतर घाबरलेल्या बहिणीने पतीसोबत अंबाजोगाई गाठून भावा विरोधात तक्रार दिली.

मुलींच्या शारीरिक, मानसिक,बौद्धिक क्षमता विकसित व्हाव्यात -डॉ.लोहिया

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महिला,मुलींच्या शारीरिक मानसिक बौद्धिक क्षमता पूर्णपणे विकसित झाल्या पाहिजेत असे मत येथील प्रसिद्ध शल्यविशारद तथा सामाजिक कार्यकर्त्या डॉ.शुभदा लोहिया यांनी व्यक्त केले .

येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या वतीने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी यो. शि.संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर होते. तर व्यासपीठावर यो.शि.संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, उपाध्यक्ष जी.बी.व्यास, राष्ट्रीय हॉकी खेळाडु श्रेया पवार, शिबीर प्रमुख भीमाशंकर शेटे , प्रा.एम.एस.लोमटे,अॅड. कल्याणी विर्धे ,डॉ. जयश्री देशपांडे,आर. व्ही.सोनवळकर ,सय्यद पाशू करीम,प्राचार्य पी.आर.थारकर, समन्वयक प्रा.प्रविण भोसले आदी उपस्थित होते.पुढे डॉ.लोहिया म्हणाल्या की आठवी ते बारावी पर्यंतचा काळ मुलींसाठी अत्यंत महत्वाचा असतो या काळात शारीरीक क्षमता मजबूत ठेवली पाहीजे कारण याच वयात बौद्धिक क्षमतेचा विकास होतो.अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापुरकर म्हणाले की, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष सर्वांचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे यांच्या प्रेरणेतून मागील चौदा वर्षांपासून हे आत्मभान शिबिर आयोजित केले जात असून मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी अशा शिबिराची आवश्यकता आहे केवळ अभ्यासाला महत्त्व न देता खेळांना देखील प्रोत्साहन दिले पाहिजे, मी कांहीं करु शकते हे अशा शिबिरातून मुलींना समजले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी श्रेया पवार, जी.बी.व्यास यांनी मनोगत व्यक्त केले.प्राचार्य डॉ.पी.आर.थारकर यांनी प्रास्ताविक व समन्वयक प्रा.प्रविण भोसले यांनी शिबिर घेण्या बाबतचा उद्देश सांगितला.संचालन प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी व वैष्णवी वाघमारे, तेजस्विनी होळंबे यांनी तर आभार डॉ.शैलजा बरुरे यांनी मानले.यावेळी पत्रकार प्रशांत बर्दापूरकर, एस.के.निर्मळे, प्रा.डॉ . गणेश पिंगळे,एम.बी. लोखंडे प्राचार्य डॉ. व्ही.बी.साखरे प्राचार्य रमण देशपांडे,प्रा.मेजर एस.पी. कुलकर्णी,प्रशिक्षक, विविध विभागांचे विभागप्रमुख , प्राध्यापक,शिक्षक, कर्मचारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

VBA BEED MEDIA May 3, 2024, 12:58

बीड -सी.ए.बी.बी.जाधव यांचे ज्येष्ठ बंधू यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त बीड येथील निवासस्थानी पुष्प अर्पण करुन अभिवादन करताना वंचित बहुजन आघाडी उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्यासह डॉ.नितिन सोनवणे, अनिल घुमरे पाटील, प्रभाकर अप्पा कोलंगडे, बालाजी जगतकर संपादक,अजय सरवदे,आदी दिसत आहेत.

ऋषिकेश मुंदडा नृत्य कला भूषण राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२४ ने सन्मानित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कल्चरल फाउंडेशन ऑफ इंडिया ने नागपूर येथे घेतलेल्या राष्ट्रीय बाल नृत्य स्पर्धेसाठी देशभरातून विविध राज्याच्या १५० स्पर्धेकाचे नामांकन आले होते यात अंबाजोगाईच्या ची. ऋषिकेश मुंदडा यास प्रथम पुरस्कार साठी निवड झाली होती.

... नागपूर येथील दिल्ली पब्लिक स्कूल येथे झालेल्या विशेष समारंभात ची ऋषिकेश यास हा नृत्यकला बाल पुरस्कार प्रदान करण्यात आला. चि.ऋषिकेश हा अंबाजोगाई येथील न्यू व्हिजन पब्लिक स्कूल मध्ये ९वी पास झालेला विद्यार्थी असून याने या पूर्वीही नृत्य कलेसाठी चेअरमन अवॉर्ड, अखिल भारतीय संस्कृतिक संघ पुणे मिळाला आहे. तसेच ठाणे येथे झालेल्या इंडिया डान्स पावरच्या मेघा राऊंड मध्ये सलेकशन झाले होते, डान्स इंडिया डान्स लिटल मास्टर मुंबई यात मेघा राऊंड मध्ये सलेकशन, सप्तरंगी सेवाभावी संस्था नांदेड यांनी आयोजीत स्पर्धेत प्रथम पारितोषिक, मिळाले असून याने विविध ठिकाणी आपल्या नृत्याचे सादरीकरण करून रसिकाची वाहवा मिळवली आहे. .तसेच केंद्र सरकारच्या कले साठीच्या शिष्यवृत्तीस २०२१ पासून तों पात्र झाला आहे. ऋषिकेश च्या या यशाबदल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पान ६ वरून...

भाजपाला भारतातून हद्दपार

निजाम, दादासाहेब मुंडे, फरीद देशमुख, नगरसेवक शेख अमर, हाफेज अश्फाक, सय्यद फहीम , शप्पो दादा,इम्तियाज मणियार, कयूम इनामदार,शेख खदिर सेठ,मोमीन जुबैर,शेख पाशा आदी उपस्थित होते.

यावेळी केके वडमारे यांनी सध्याचे परिस्थिती लोकशाहीवादी पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना मतदान करण्याचे आवाहन करून सर्वांनी आपणच उमेदवार समजून कामाला लागण्याचे आवाहन केले तर आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांनी केंद्र शासनाचे वतीने सत्तेच्या दुरुपयोग करून चार राज्याचे मुख्यमंत्री यांचे विरोधात करण्यात आलेली कारवाई बाबत सविस्तर माहिती सादर केली व आपले पक्षाचे प्रमुख व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे बाबत झालेली कारवाईचा विरोध दर्शविण्यासाठी बजरंग सोनवणे यांना निवडून देण्याचे आवाहन केले आहे समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष कमरुल इमान यांनी मतदानाचे महत्त्व या विषयावर बोलताना अपक्ष उमेदवारांच्या समाचार घेऊन कोणत्याही परिस्थितीत आपलं मत वायांना जाऊ देण्याचे आवाहन करून सर्व नागरिकांनी शंभर टक्के मतदान व्हावे आणि बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्याची जबाबदारी घेण्याचे आवाहन केले. शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की शासनाच्या दुरुपयोग करून भाजपाने शिवसेना पक्ष सोबतच राष्ट्रवादी पक्ष फोडून नैतिकता गमविले आहे असे पक्ष देशासाठी धोकादायक असून यांना घरी बसविण्याची ही योग्य वेळ आहे जर यावेळी चूक झाली तर भविष्यात पुन्हा संधी भेटणार नाही म्हणून आपण आपले मत वाया न जाता महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याची आवाहन त्यांनी केले आहे शिवसेना चे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी जनतेशी आवाहन करून यावेळी आपले मताची ताकद दाखविण्याचे आणि या संधीचे सोने करण्याचे आवाहन केले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दादासाहेब मुंडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन करत प्रास्तपितांना त्यांची जागा दाखविण्याचे आव्हान सुद्धा केले. बीडचे माजी आमदार सिराज देशमुख यांनी मताचे महत्त्व या विषयावर आपले मनोगत व्यक्त करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समाचार घेतला नरेंद्र मोदी सतत खोटे बोलून जनतेची दिशाभूल करण्याचे काम करत आहे पंतप्रधान या पदावर असताना ते मताचे ध्रुवीकरण करण्याचे काम करीत असल्याने त्यांना या पदावर राहण्याचे अधिकार नाही नागरिकांनी मताचे माध्यमाने देश वाचविण्याचे काम करावे असे आव्हान त्यांनी केले आहे. माजी राज्यमंत्री सुरेश नवले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की कोणत्याही परिस्थितीत देशात भाजपाची सत्ता येऊ नये यासाठी सर्वांनी मिळवून काम करण्याची गरज आहे गरज आहे भाजपाचे सर्व नेते खोटारडे असून ते विकासावर बोलत नाही गेल्या निवडणुकीत रेल्वेमध्ये बसवून निवडणुकीचे फॉर्म दाखल करण्यासाठी येणार असल्याचे आश्वासन दिले होते परंतु रेल ही आली नाही आणि ते खासदाराला उमेदवारी पण मिळाली नाही बीडच्या रेल्वेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी बजरंग सोनवणे यांची विजय गरजेची आहे तर यांनी या माध्यमाने देशात भाजपाची सत्तेला तडीपार करण्याचे आवाहन करून त्यांनी आपले मताचे विभाजन होऊ नाही यासाठी दक्षता घेण्याची सूचना सुद्धा केली या या बैठकीचे सूत्रसंचालन नगरसेवक शेख अमर यांनी केले तर आभार शिवसेनेचे शहर प्रमुख शेख निजाम यांनी व्यक्त केले

शेतकरी ऊसतोड आणि कामगार

दुप्पट क्षमतेने चालू आहेत. माझा जन्म कोणत्याही राजकारणाच्या पोटी झालेला नसताना सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलो. माझे आई-वडील शेतकरी असेल तरी मला राजकीय जन्म देणारे सामान्य नागरिक हे माझे राजकीय मायबाप आहेत. असे उदगार काढले.मागील दहा ते पंधरा वर्षां मध्ये जर भाजपने मतदारसंघाचा विकास केला असता तर मग त्यांना मतांची भीक मागण्याची आवश्यकता पडली नसती. जे आज मला विरोध करीत आहेत त्यांचाही ऊस मीच गाळप केला. त्यामुळे उसासाठी कोणीही घाबरण्याचे कारण नाही. असे आश्वासित केले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

फुलचंद कराड :- स्वतःला विकास कन्या म्हणविणाऱ्या भाजपच्या उमेदवार ते म्हणाले की जर त्या पालकमंत्री असताना त्यांनी मतदारसंघाचा विकास केला असता तर त्या निवडणुकीत पराभूत झाल्याच नसत्या. तसेच वैजनाथ कारखाना बुडविण्यासाठीच या दोघा बहिण भावांनी जागा वाटून घेतल्या. याचे वाईट वाटत नाही. मात्र स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी रक्ताचे पाणी करून त्याची उभारणी केली

तो कारखाना बंद असल्याने त्याचे मनस्वी दुःख होते. त्यामुळे या दोन्ही बहिण भावांना आता मतदाराने घरी बसण्याची वेळ आलेली आहे. असे फुलचंद कराड म्हणाले.

धारूरचे ज्ञानदीप विद्यालयाचे तीन विद्यार्थी पाचवी शिष्यवृत्तीस पात्र

किल्लेधारूर । प्रतिनिधी

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय किल्ले धारूर चे तीन विद्यार्थी इयत्ता ५ वी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक हो आहे

धारूर शहरातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील तिन विद्यार्थी इयत्ता पाचवी वर्गा साठी असणा-या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करत

अदिती संभाजी तिबोले गीता बाबासाहेब मुंडे, अदिराज बालाजी चव्हाण हे शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतूक होत आहे.शाळेने यशाची परपंरा कायम ठेवली आहे.

हुसेन शेख बहुउद्देशीय सामाजिक संस्थाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पांगुळ गाव ईथे हुसेन शेख बहुउद्देशीय सामाजिक संस्थांचे अध्यक्ष रशीद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह देऊन त्यांचख गुणगौरव करत कौतुकाची थाप दिली आहे हुसेन शेख बहुउद्देशीय सामाजिक संस्था हि सर्व महाराष्ट्रात समाज सेवेची काम करत आहेत असते दर साला प्रमाने या वर्षी हि आपल्या सह खर्चाने मान सन्मान गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे आयोजक रशीद शेख अध्यक्ष सचिव रुक्सना उप अध्यक्ष सलीमा शेख व कार्यक्रमाचे अध्यक्ष घोडके साहेब समाज सेवक उद्घाटन अध्यक्ष कवी प्रेम पवळ

व पोलिस पाटील सर्जेराव येवले, सर्जेराव गाडगे ग्राम पंचायत सदस्य परमेश्वर पवार व सुत्र संचालन मीडीया भारत चैनलचे उपसंपादक प्रफुल्ल केदार साहेब यांनी केले गावकरी ग्रामस्थ उपस्थित राहुन यांनी कार्यक्रमांची शोभा वाढवाली या कार्यक्रमाला आलेले प्रमुख पाहुणे यांची भोजनाची व्यवस्था साहेबराव मुळें व बंडु खरात यांनी केली होती आणि कार्यक्रमांचे मंडप डेकरोशन सुरेश येवले यांनी केली आहे हुसेन शेख बहुउद्देशीय सामाजिक सेवा संस्थेला फुलं देऊन केली संपूर्ण मदत प्रमुख पाहुणे यांनाही समान चिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे तसबीर शेख ताजुदिन शेख बाबासाहेब वनवे लाला पवार दता पवार लीबा उमप ,शरद गायकवाड (सर), भाऊसाहेब शेकडे,धुळा लकडे आणि बोंद्रे ग्रुप पवार ग्रुप आगलावे ग्रुप यांच्या सर्वांच्या वतीने पांगुळगा नगरी मध्ये मान सन्मान कार्यक्रम आयोजित पार पाडण्यात आले आहे आणि आपले पहाडी आवाजात लक्ष्मण माळी यांनी पत्रकार भाऊ वर गाणे गाऊन कार्यक्रम ला शोभा दिली आहे.

मनाची प्रसन्नता व एकाग्रता साधण्यासाठी अंबाजोगाई येथे ४ व ५ मे रोजी दोन दिवसीय ’समता विपश्यना शिबिराचे आयोजन

आयोजक सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले व शिक्षण तज्ज्ञ प्रा.नागेश जोंधळे यांची माहिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे प्रथमच जागतिक ख्यातीचे संशोधक तथा शास्त्रज्ञ डॉ.लिम सिओ जीन (मलेशिया) ,आय.आय.टी.खरगपूर तथा शून्यती इंटरनॅशनल फाउंडेशन चे संस्थापक यांच्या आधुनिक पद्धतीने वैज्ञानिक संशोधनावर आधारित जगातील २०० देशांमध्ये सुपरिचित असलेले शून्य-ध्यान मेडिटेशन या शिबिरासाठी सुन्नती इंटरनॅशनल फाउंडेशनचे संस्थापक व जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ डॉ.लिम सियो जिन (मलेशिया), डॉ.राजेश सवेरा (संचालक, सिफ, पुणे व भारत), प्रा.विनय सोनुले - केंद्रीय समन्वयक, सिफ नागपूर, यांच्या मार्गदर्शनाखाली आता आपल्या अंबाजोगाई मध्ये प्रख्यात आरोग्य तज्ज्ञ तथा आईरत्न डॉ.प्रशांत दहिरे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा मनाचे डॉक्टर म्हणून ख्याती असलेले डॉ.राजेश इंगोले व आई सेंटर प्रोचे संस्थापक, सुप्रसिद्ध लेखक तथा विश्वविक्रमवीर प्रशिक्षक नागेश जोंधळे यांच्या पुढाकाराने शून्य ध्यान मेडिटेशन - दोन दिवसीय शिबीर शनिवार, दिनांक ४ मे व रविवार ५ मे २०२४ रोजी हॉटेल पियुष इन, अंबाजोगाई येथे होत आहे.

आजच्या या धकाधकीच्या जीवनात व स्पर्धामय युगात शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते प्रशासनातील उच्च पदावरील अधिकारी, कर्मचारी, शेतकरी, सिनेसृष्टीतील दिग्गज कलावंत, अध्यात्म व सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे धर्मगुरू, राजकीय नेते, डॉक्टर्स, इंजिनियर्स, शिक्षक, प्राध्यापक, पालक, वकिल तसेच उद्योग व इतर अनेक क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्व असणारे अनेक दिग्गज मंडळींनी दैनंदिन जीवनातील तथा वैयक्तिक व कौटुंबिक ताण-तणावातून वा मन-मोकळेपणाने व्यक्त न होता आल्यामुळे तसेच मोबाईल, कॉम्प्युटर, इंटरनेट व सोशल मिडियाच्या अतिरेकामुळे सोबतच तंबाखू, गुटखा, मटका, दारू, पोर्न, ड्रग्स, अंमली पदार्थ इत्यादींच्या सेवनामुळे व्यसनाधीन झालेले असंख्य तरूण-तरूणींनी ऐन उमेदीच्या काळात स्वतःची बहुमोल जीवनयात्रा संपविली व यामुळे त्यांचे स्वतः सहित परिवाराचे, समाजाचे व देशाचे हे मोठे नुकसान होत आहे. वरील सर्व समस्यांवरवर प्रभावशाली व सर्व गुणकारी उपाय म्हणजे नियमित ध्यान धारणा करणे, आपल्या मनातील विचारांना सुयोग्य असे संस्कार करून स्वतःला मानसिकरित्या अधिक मजबूत बनवण्यासाठी सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशन, समाधान रुग्णालय, आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य असणारे आई सेंटर प्रो व इंग्लिश विंग्स प्री प्राइमरी स्कूल इंडियन मेडिकल असोसिएशन,महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे व नागपूर या महानगरानंतर प्रथमच सुसंस्कृत शहर म्हणून नांवलौकिक असलेल्या अंबाजोगाई येथे हे ध्यान शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. या दोन दिवसीय शिबिराचे वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात असंख्य असे फायदे अनुभविण्यासाठी तसेच मर्यादित प्रवेश असल्यामुळे आपली पूर्व नांव नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी आई सेंटर प्रो कॅम्पस, संत सावता माळीनगर, अंबाजोगाई येथे प्रत्यक्ष भेट देऊन या ९६२३६४६९४४ / ८८०६६४३९४४ या भ्रमणध्वनी क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या शिबिरामुळे आपल्या ताणतणाव युक्त जीवनात या ताणतणावास योग्य प्रकारे कसे हाताळावे, विपरीत परिस्थितीत सकारात्मक मानसिकता कशी बनवावी, दैनंदिन जीवनात मन स्थिर कसे ठेवावे आणि आयुष्यात विजेत्यांची मानसिकता कशी तयार करावी याबद्दल सखोल मार्गदर्शन जगविख्यात तज्ज्ञांच्या मार्फत करण्यात येणार आहे तरी आपल्या स्वतःसाठी वा आपल्या नातेवाईकांच्या फायद्यासाठी सर्व अंबाजोगाइकरांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.राजेश इंगोले, प्रा.नागेश जोंधळे, डॉ.प्रशांत दहिरे व इतर आयोजकांनी केले आहे

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि.४ मे २०२४

देशातून विक्रमी बासमती तांदूळ निर्यात

मिळाले ४८००० कोटींचे परकीय चलन!

पुणे : अन्नधान्याच्या बाबतीत भारत आघाडीवर असून, गव्हासह तांदळाचे देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. तसेच देशातून धान्याची मोठ्या प्रमाणात निर्यात देखील केली जाते. यंदा देशातून बासमती तांदळाची आजवरची विक्रमी निर्यात झाली आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये सुमारे ४८ हजार कोटी रुपये मूल्याच्या ५० लाख टन बासमती तांदळाची निर्यात झाली आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये मागील दोन आर्थिक वर्षांच्या तुलनेत बासमती तांदळाच्या निर्यातीत ११.५ टक्क्यांनी वाढ होऊन ४४ हजार कोटी रुपये मूल्याच्या ४९ लाख टन तांदळाची निर्यात झाली होती. अर्थात यंदा केवळ वजनाच्या बाबतच नाही, तर मूल्याच्या बाबतही विक्रमी निर्यात ठरली आहे.

सौदी अरेबिया हा भारताचा सर्वात मोठा बासमती तांदळाचा आयातदार देश ठरला आहे. सौदी अरेबियात भारताने यावर्षी १०.९८ लाख मेट्रिक टन बासमती तांदूळ विकून १०३९१ कोटी रुपये कमावले आहेत. या देशात मोठ्या प्रमाणात तांदळाची निर्यात झाल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळत आहे. २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत, भारताने जगातील १०० हून अधिक देशांमध्ये ५२,४२,५११ मेट्रिक टन बासमती तांदूळ निर्यात केला आहे. वर्षभरात निर्यातीतून भारताने ४८३८९.२ कोटी रुपये कमावले आहेत. पाकिस्तानच्या अडथळ्यानंतरही मोठ्या प्रमाणात तांदळाची निर्यात केली जात आहे. किती दराने झाली निर्यात : निर्यातीसाठी बासमतीचे दर प्रतिटन आठ ते १२ हजार रुपयांपर्यंत राहिले. भारतातून निर्यात होणाऱ्या बासमती तांदळामध्ये पारंपरिक बासमती, ११२१ बासमती, १५०९ बासमती, १४०१ बासमती, पूसा बासमती या वाणांचा समावेश असतो. देशात प्रामुख्याने पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, दिल्ली, उत्तर प्रदेश, जम्मू-काश्मीर या राज्यांत वेगवेगळ्या प्रकारच्या बासमती तांदळाचे उत्पादन होते. गंगा नदीच्या खोऱ्यात पाणी आणि जमिनीच्या गुणधर्मामुळे दर्जेदार बासमती तांदळाचे उत्पादन होते.

निर्यातीसाठी पोषक वातावरण : देशातून बिगरबासमती तांदळाच्या निर्यातीवर निर्बंध लादल्यामुळे जगभरात बिगरबासमती तांदूळ खाणाऱ्यांनी बासमती तांदळाला प्राधान्य दिले जात आहे. पाकिस्तानमधून बासमती तांदळाची निर्यात होते, पण राजकीय अस्थिरता, निवडणुकांमुळे पाकिस्तानमधून होणारी निर्यात घटली आहे. परिणामी भारतीय बासमती तांदळाची निर्यात वाढली आहे. मागील वर्षात बासमतीचे चांगले उत्पादन झाले होते. वर्षभर दर स्थिर होते. एकूण परिस्थिती पाहता बासमती तांदळाच्या निर्यातीला पोषक वातावरण होते.

स्टोन पिकर मशीन च्या मदतीने काढा शेतामधील दगड गोटे

सध्याच्या घडीला सर्वच क्षेत्रात यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ज्यामुळे मानवी वेळ आणि श्रमामध्ये बचत झाली आहे. याला कृषिक्षेत्र देखील अपवाद नाही. अगदी छोट्या-मोठ्या कामासाठी सध्या शेतीमध्ये यंत्रांचा वापर होऊ लागला आहे. शेताची पूर्वमशागत ते पिकांची काढणी इथपर्यंतचे कामे आता यंत्रामार्फत होऊ लागल्याने, शेतकऱ्यांच्या वेळेत आणि पैशामध्ये बऱ्यापैकी बचत होत आहे. शेती करीत असताना बऱ्याचदा शेतीमध्ये दगड आणि गोट्यांचे प्रमाण असल्यामुळे मशागत करण्यास खूप मोठ्या प्रमाणावर समस्या निर्माण होतात. हे दगडगोटे वेचून बाहेर काढणे फार जिकिरीचे काम असते. परंतु आता चिंता करण्याची गरज नसून, यासाठी स्टोन पिकर मशीन खूप उपयुक्त ठरत आहे.

स्टोन पिकर मशीनची वैशिष्ट्ये :

बरेच शेतकरी थोड्याशा डोंगराळ भागात शेती करतात. परंतु अशा ठिकाणी बऱ्याच प्रकारची दगड-गोटे मोठ्या प्रमाणात असल्यामुळे मशागत करण्यास अडचणी निर्माण होतात व यामुळे बियाण्याची उगवण क्षमता देखील प्रभावित होते. अशी शेतातील दगडगोटे उचलणारी म्हणजेच स्टोन पिकर मशीन खूप उपयुक्त आहे. या यंत्राच्या साह्याने शेतातील बारीक दगड-गोटे देखील सहजपणे वेचून, आपले शेत व्यवस्थित स्वच्छ करता येते. या यंत्राचे वैशिष्ट्य म्हणजे हे छोटे आणि मोठ्या आकाराचे सगळ्या प्रकारचे दगडगोटे एकाच वेळेस उचलून घेते.

कसे काम करते हे यंत्र? : स्टोन पिकर मशीनला ऑपरेट करण्यासाठी ट्रॅक्टरची आवश्यकता असून, एका एकर क्षेत्रातील दगड गोटे दोन तासात उचलून देण्याची त्याची क्षमता असते. त्यामुळे शेतीची मशागत करणे सोपे होते व कमी कष्ट लागतात. छोटे-मोठे अशा सगळ्या प्रकारचे दगड गोटे यामुळे उचलता येणे शक्य आहे. शेतीची मशागत व्यवस्थित करता आल्यामुळे पिकांच्या उत्पादनात वाढ होते. पिकांची गुणवत्ता देखील सुधारते व जमीन चांगली उत्पादनक्षम बनते.

किती आहे 'या' यंत्राची किंमत: बाजारामध्ये यंत्र जवळपास चार लाख रुपयांपर्यंत मिळते. यंत्राची मॅन्युफॅक्चरिंग पंजाब राज्यात मोठ्या प्रमाणावर केली जाते. जर तुम्हाला देखील हे यंत्र खरेदी करायचे असेल तर तुम्ही पंजाब राज्यातील खासगी कंपन्यांची याबाबतीत संपर्क करू शकतात एवढेच नाही तर आपल्याकडील काही खासगी कंपन्या देखील या बाबतीत तुम्हाला माहिती पुरवू शकतात.

शेळीची कोकण कन्याळ जात शेळीपालनासाठी उत्तम पर्याय

सध्या शेळीपालन व्यवसाय हा मोठ्या प्रमाणावर केला जात असून, राज्यातील अनेक सुशिक्षित बेरोजगारांसाठी एक आर्थिक संधी म्हणून शेळीपालन व्यवसाय समोर आला आहे. कमी खर्चात व कमी जागेत चांगला नफा हा शेळीपालन व्यवसायाच्या माध्यमातून मिळणे शक्य आहे. मात्र, त्यासाठी गरज आहे ती व्यवस्थित नियोजनाची आणि शेळीपालनासाठी योग्य जातींची निवड या गोष्टींची होय. शेळ्यांच्या विविध प्रकारच्या प्रजाती भारतात आहेत व प्रजातीनुरूप वेगवेगळे गुणधर्म प्रत्येक शेळीचे आहेत. व्यवसायासाठी जात निवड महत्वाची : शेळीपालनासाठी आपल्याला फायदा देऊ शकेल आणि उपयुक्त अशा जातीची निवड करणे खूप महत्त्वाचे आहे. शेळीपालन व्यवसायाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात नफा मिळवण्याच्या विचारात असाल तर 'कोकण कन्याळ' या जातीच्या शेळ्यांचे पालन करू शकतात.

कोकण कन्याळविषयी माहिती : कोकण कन्याळ या जातीच्या शेळीचा विचार केला तर ही कोकण किनारपट्टीलगत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग आणि कुडाळ या भागातील असून, विदर्भात देखील या जातीच्या शेळ्या काही प्रमाणात आढळतात. प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी ही शेळी उपयुक्त असून, दर दोन वर्षात तीनदा करडांना जन्म देते.

किती वजन मिळते? : ही शेळी वयाच्या १७ व्या महिन्यात पहिल्यांदा विते. तसेच तिचे दोन वेतातील अंतराचा विचार केला तर ते आठ महिने इतके असते. या शेळीचा सरासरी दूध उत्पादन काळ ९७ दिवसाचा असून, या कालावधीत ६० लिटर दूध देते. त्यासोबत या शेळीचा भाकड काळ ८४ दिवसांचा असतो. कोकण कन्याळ जातीच्या नराचे वजन हे २५ किलो तर मादी शेळीचे वजन २१ किलोपर्यंत भरते. एक ते दीड वर्षाच्या बोकडाच्या मटणाचा उतारा ५३ टक्के इतका असतो. शेळीचे शारीरिक गुणधर्म : या जातीच्या शेळीच्या वरच्या जबड्यावर पांढऱ्या व तांबूस रंगाचे पट्टे असतात. या जातीच्या शेळीचे पाय लांब असून पायावर काळा पांढरा रंग असतो. पाय लांब व मजबूत असल्यामुळे या शेळ्या डोंगराळ भागात सहज जुळवून घेतात. शिंगे टोकदार असतात व कपाळ चपटे व रुंद असते. शिंगे हे सरळ व मागे वळलेली असतात. नाक रुंद असते व स्वच्छ असते.

टोमॅटो च्या योग्य वाणांची लागवड केल्यास मिळेल विक्रमी उत्पादन

यंदाचा पावसाळा महिनाभरावर येऊन ठेपला आहे. त्यातच हवामान विभागाने यंदा सरासरीच्या तुलनेत अधिक पाऊस पडणार असल्याचे आपल्या अंदाजात म्हटले आहे. त्यामुळे सध्या राज्यातील बऱ्याच भागांमध्ये शेतकऱ्यांची पीक नियोजनाची लगबग सुरु झाली आहे. अनेक जण सध्या कोणते टोमॅटो वाण निवडावे? याबाबत चर्चा करताना दिसून येत आहेत. टोमॅटोच्या पावसाळी हंगामात लावता येणाऱ्या काही प्रमुख जातींची माहिती जाणून घ्यायला हवी. शेतकऱ्यांनी प्रामुख्याने टोमॅटोची लागवड करताना काही गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने पावसाळी हंगामातील टोमॅटो लागवडीसाठी जमिनीच्या मगदूराप्रमाणे, स्थानिक हवामानानुसार योग्य जातींची निवड करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिक कृषी सेवा केंद्र चालकाचा किंवा कृषी तज्ज्ञांचा सल्ला घेता येऊ शकतात. किंवा मग योग्य त्या शिफारस करण्यात आलेल्या वाणांची निवड करू शकतात.

पुसा रुबी : पुसा रूबी हा टोमॅटोचा एक सुधारित वाण असून याची पावसाळी हंगामात लागवड करता येणे शक्य आहे. कृषी तज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे या जातीची तिन्ही हंगामात लागवड करता येणे शक्य आहे. या जातीचे पीक तीन महिन्यात हार्वेस्टिंगसाठी तयार होते. या जातीपासून हेक्टरी ३२५ क्विंटल पर्यंतचे उत्पादन मिळत असल्याचा दावा केला जातो. पुसा गौरव : हा देखील टोमॅटोचा एक सुधारित प्रकार आहे. या जातीची देशातील अनेक प्रमुख टोमॅटो उत्पादक भागांमध्ये लागवड पाहायला मिळते. या जातीपासून शेतकऱ्यांना हेक्टरी ४०० क्विंटल पर्यंतचे दर्जेदार उत्पादन मिळत असल्याचा दावा केला जातो आहे. पुसा शितल : पुसा शितल या जातीची देखील देशातील अनेक राज्यांमध्ये लागवड केली जाते. या जातीपासून हेक्टरी ३५० क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळत असल्याचा दावा केला जातो आहे. अर्का गौरव : या जातीचे टोमॅटो गडद लाल रंगाचे असतात. या जातीपासून शेतकऱ्यांना चांगले विक्रमी उत्पादन मिळत आहे. कृषी तज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे या जातीपासून शेतकऱ्यांना हेक्टरी ३५० क्विंटल पर्यंतचे उत्पादन मिळू शकते.

रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड; विक्रीतून मिळतो मोठा नफा

शरीरासाठी आरोग्यदायी आणि बाजारात जास्त दरात विकली जाणारी रंगीबेरंगी फुलकोबीच्या लागवडी विषयी माहिती जाणून घेतल्यास चांगला फायदा होऊ शकतो. रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड पद्धती : रंगीत फुलकोबीच्या लागवडीसाठी ४ ते ५ आठवड्याच्या रोपांची शेतात ६० ६० सें.मी. आणि ६०४५ सें.मी. अंतरावर लागवड करावी. रोपे पुनर्लागवड नंतर पिकाला हलके सिंचन देणे आवश्यक आहे. खत व्यवस्थापन - कुजलेले शेणखत उपलब्ध असल्यास लागवडीच्या १५ दिवस अगोदर १०० क्विंटल शेणखत आणि कंपोस्ट खताची संपूर्ण मात्रा शेतात मिसळावी. ४५ ते ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि १५-१६ किलो पालाश प्रति एकर वापरावे. स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा आणि अर्धी नत्राची मात्रा लागवडीच्या १५ दिवस आधी शेतात टाकून चांगले मिसळावे. नत्राची उर्वरित मात्रा दोन समान भागांमध्ये विभागून पुनर्लागवडीनंतर ३०-३५ आणि ४५ ते ५० दिवसांनी टॉप ड्रेसिंग म्हणून द्यावे. याशिवाय जमिनीत तण काढताना व मशागत करताना ६०० ग्रॅम अमोनियम मॉलिब्डेट आणि ५ किलो बोरॉन प्रति एकर जमिनीतून द्यावे.

सिंचन आणि तण नियंत्रण : पिकाच्या यशस्वी लागवडीसाठी रोपाची लागवड केल्यानंतर गरजेनुसार १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. रंगीत फुलकोबी लागवडीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी करून मातीची भर द्यावी. यानंतर गरजेनुसार खुरपणी करावी.

कीड आणि रोगांचे व्यवस्थापन : रंगीबेरंगी फुलकोबीमध्ये, डायमंड बॅक मॉड आणि मस्टर्ड फ्लाय या मुख्य किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सेंद्रिय औषध बॅसिलस थूरिंगिएन्सिसच्या द्रावणाची फवारणी करावी, असे प्रौढ कीटक पकडण्यासाठी फेरोमोन सापळ्यांचा वापर करावा. रंगीत फुलकोबीमध्ये मर रोगास प्रतिबंध करण्यासाठी ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. शेतात २० ग्रॅम प्रति चौरस मीटर या दराने जमिनीत कंपोस्ट खत मिसळून वापरा. हा रोग आढळल्यास रोपवाटिकेला पाणी देऊ नका. इतर प्रमुख रोगात काळी सड रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोगट झाडे गोळा करून नष्ट करावीत. हा रोग टाळण्यासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड आणि स्ट्रेप्टोसायक्लिन २०० पीएम या द्रावणाची फवारणी करावी.

काढणी आणि उत्पादन : रंगीबेरंगी फुलकोबीचे पीक लागवडीनंतर १०० ते ११० दिवसांनी काढणीसाठी तयार होते. पिकाचे सरासरी एकरी १०० ते १२५ क्विंटल उत्पादन मिळते.

एक एकरात फुलकोबीची लागवड केल्यास सुमारे ५० हजार रुपये खर्च येतो. बाजारात ते २५ रुपये किलोने सहज विकले जाते. अशा प्रकारे १०० क्विंटलपासून एकूण उत्पन्न सुमारे अडीच लाख रुपये होईल. निविष्ठा खर्च कमी केल्यास शेतकर्याला २ लाख रूपयांचा निव्वळ नफा मिळेल.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१७७५ : पेरीस देशांत उघडणाऱ्या आणि बंद होणाऱ्या छत्रीचा शोध लावण्यात आला.
१७८० : अमेरिकन एकेडमी ऑफ आर्ट्स अँड सायन्सची स्थापना करण्यात आली.
१७९९ : श्रीरंगपट्टणमच्या लढाईत टिपू सुलतान ब्रिटिशांकडून मारला गेला.
१८५४ : भारतातील पहिले टपाल तिकीट प्रकाशित झाले.
१९०४ : अमेरिकेने पनामा कालव्याचे काम सुरू केले.
१९१० : रॉयल कॅनेडियन नेव्ही ची स्थापना.
१९३० : ब्रिटीश पोलिसांनी महात्मा गांधींना अटक करून येरवडा तुरुंगात ठेवले.
१९५९ : पहिले ग्रॅमी पुरस्कार आयोजीत केले गेले.
१९६७ : श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर नाशिक येथील मंदिरात जाऊन देवाची पूजा करण्याचा अधिकार सर्वांना आहे असा उच्च न्यायालयाचा निर्णय.
१९७९ : मार्गारेट थॅचर युनायटेड किंग्डमच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या.
१९८९ : सर्व पंचायत समित्यांमधे महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवल्या जातील, अशी पंतप्रधान राजीव गांधी यांनी घोषणा केली.
१९९२ : संगीतकार भूपेन हजारिका यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर
१९९५ : 'बॉम्बे' वजी 'मुंबई' हेच मूळ नाव अधिकृत राहील, असा शिवसेना-भाजप युती यांच्या राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.
१९९५ : महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने 'बॉम्बे' चे 'मुंबई' असे नामकरण करण्याचा निर्णय घेतला.
१९९६ : जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारताला सहा पदके, एन. कुंजुरानीदेवीला दोन रौप्यपदके

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१००६ : पर्शियन सुफि संत अबू इस्माल अब्दुल्लाह अल-हेरावी अल-अंसारी उर्फ अब्दुल्ला अन्सारी यांचा जन्मदिन.
१००८ : ख्वाजा अब्दूल्ला अन्सारी पर्शियन सूफी संत (मृत्यू: १०८८)
१००८ : हेन्री (पहिला) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ४ ऑगस्ट १०६०)
१६४९ : छत्रसाल बुंदेला बुंदेलखंडचा महाराजा (मृत्यू: २० डिसेंबर १७३१)
१६५५ : पियानोचे निर्मिते बार्टोलोमीओ क्रिस्टोफोरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १७३१)
१७६७ : त्यागराज दाक्षिणात्य संगीतकार (मृत्यू: ६ जानेवारी १८४७)
१९०२ : भारतातील कर्नाटक राज्याचे पहिले मुख्यमंत्री क्यासमांबल्ली चेंगलुराया रेड्डी यांचा जन्मदिन.
१८२५ : थॉमस हक्सले ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ, विज्ञानकथालेखक आणि डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा खरा समर्थक (मृत्यू: २९ जून १८९५ इस्ट्बोर्न, इंग्लंड)
१८४७ : महर्षी विनायक रामचंद्र उर्फ अण्णासाहेब पटवर्धन धार्मिक आणि राष्ट्रीय मनोवृत्तीचे पुण्यातील एक नामांकित धन्वंतरी व लोकमान्य टिळकांचे स्नेही (मृत्यू: २ फेब्रुवारी १९१७)
१८४९ : ज्योतिरिंद्रनाथ टागोर थोर बंगाली साहित्यिक, नाटककार, संगीतकार, चित्रकार व संपादक, रविंद्रनाथ टागोर यांचे वडील बंधू, त्यांनी लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याचे बंगालीत भाषांतर केले (मृत्यू: ४ मार्च १९२५ रांची, झारखंड)
१९२८ : होस्नी मुबारक इजिप्तचे चौथे राष्ट्राध्यक्ष
१९२९ : ऑड्रे हेपबर्न ब्रिटिश अभिनेत्री, संयुक्त राष्ट्रांच्या बालक निधीच्या सदिच्छा प्रतिनिधी, 'रोमन हॉलिडे' या चित्रपटातील अभिनयाबद्दल त्यांना ऑस्कर पुरस्कार मिळाला. (मृत्यू: २० जानेवारी१९९३)
१९२९ : वीरसेन आनंदराव तथा 'बाबा' कदम गुप्तहेरकथालेखक (मृत्यू: २० आक्टोबर २००९)
१९३३ : प्रख्यात मराठी कादंबरीकार बाबा कदम यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर २००९)
११३४ : महात्मा बसवेश्वर.
१९३४ : अरुण दाते भावगीत गायक
१९४० : रॉबिन कूक इंग्लिश कादंबरीकार
१९४२ : सत्यनारायण गंगाराम तथा सॅम पित्रोडा भारतातील दूरसंचारसेवांचा विस्तार करण्यास कारणीभूत असलेले शास्त्रज्ञ, पंतप्रधानांचे विज्ञान व तंत्रज्ञानविषयक सल्लागार
१९४३ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ प्रसांत पटनाईक याचा जन्म.
१९४५ : भारतीय पत्रकार आणि कस्तुरी कुटुंबाचे सदस्य तसचं, 'द हिंदू' समुहाचे माजी व्यवस्थापकीय संचालक व माजी मुख्य संपादक एन. राम यांचा जन्मदिन.
१९८४ : मंजुरूल इस्लाम बांगला देशचा क्रिकेटपटू (मृत्यू: १६ मार्च २००७)

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९९ : टिपू सुलतान, म्हैसुरचा वाघ म्हणून ओळखला जाणारा पराक्रमी श्रीरंगपट्टणम येथे इंग्रजांशी लढताना मारला गेला.
१७९९ : हैदरअलीचा थोरला मुलगा व मैसूरचा वाघ, शहाबहादूर फतेह अली खान ऊर्फ टिपू सुलतान इंग्रजांबरोबर झालेल्या लढाईत ठार झाला. (जन्म: २० नोव्हेंबर १७५०)
१९०५ : स्वातंत्र्य भारतातील पहिला महिला न्यायाधीश तसचं, उच्च न्यायालयाच्या पहिल्या भारतीय महिला न्यायाधीश आणि स्वातंत्र्यपूर्व भारतातील एमिली मर्फी यांच्यानंतर न्यायाधीश पदी विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला अण्णा चंडी यांचा जन्मदिन.
१९६८ : बंगाली साहित्यिक आशुतोष मुखोपाध्याय यांचे निधन.
१९८० : अनंत काणेकर चतुरस्त्र साहित्यिक, कवी व पत्रकार, 'पद्मश्री' व 'सोविएत लँड नेहरू पुरस्कार' विजेते. मुंबईतील 'नाट्यमन्वंतर' या प्रयोगशील नाट्यसंस्थेचे ते एक संस्थापक होते. (जन्म: २ डिसेंबर १९०५)
१९८० : जोसेफ टिटो क्रांतिकारक आणि युगोस्लाव्हियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: ७ मे १८९२)
१९३८ : ज्युदोचे संस्थापक कानो जिगोरो यांचे निधन. (जन्म: २८ ऑक्टोबर १८६०)
२००८ : किशन महाराज तबलावादक (जन्म: ३ सप्टेंबर १९२३)

महिलांनी सक्रीयपणे मतदानात सहभाग नोंदवावा : जिल्हा निवडणूक अधिकारी

बीड । प्रतिनिधी

महिलांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात प्रगती साधली आहे. मतदारांमध्ये जनजागृतीचे कामही महिला उत्कृष्टपणे पार पाडीत आहे. बीड लोकसभा मतदार संघातील निवडणूका सोमवार दिनांक १३ मे ला होणार आहेत. यामध्ये महिलांनी निसंकोचपणे स्वविवेकाने आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले. बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये ५५ महिला मतदान केंद्र राहतील. या मतदान केंद्राच्या ठिकाणी महिला अधिकारी कर्मचारी राहतील.

महिलांचा मतदानात सक्रिय सहभाग असावा यासाठी स्तनदा माता, गरोदर महिला, लहान बालके असलेले आई यांच्यासाठी मतदान केंद्रावर तात्पुरत्या अंगणवाड्या उभारण्यात येत आहेत. या ठिकाणी पाळणा लहान मुलांसाठी, खेळणे असणार आहेत. स्तनदा माता आपल्या बाळांना याठिकाणी दूध पाजू शकतात. आपल्या लहान बालकांना तिथे ठेवून मत द्यायला जाऊ शकतात, गरोदर माता तिथे काही काळ आराम करू शकतात. अशी तयारी प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे. महिलांमध्ये कोणतही काम चोखपणे करण्याची जिद्द चिकाटी, ध्येय असते. एकही महिला मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही यासाठी प्रशासन काम करीत आहे आपण पुढे येऊन मतदान करा. प्रशासनातील महिला अधिकारी टक्का वाढवण्यासाठी प्रयत्नरत जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे या स्वतः दिवस-रात्र काम करून बीड लोकसभा मतदार संघातील मतदारांनी अधिकाधिक मतदान करावे, यासाठी प्रयत्नरत आहेत. त्यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात सर्वच अधिकारी कर्मचारी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तयारीत आहेत. यासह बीड विधानसभा मतदार संघातील सहाय्यक निवडणूक अधिकारी कविता जाधव यादेखील अधिकाधिक मतदान विधानसभा मतदारसंघात व्हावे, यासाठी तयारीला लागल्या आहेत. कायदा सुव्यवस्था नीट राहावी, याकरीता आंबेजोगाईच्या अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके या सज्ज आहेत. महिलांनी मतदानाच्या दिवशी सक्रिय राहावे, यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील यादेखील प्रयत्न करत आहेत. माजलगाव तालुक्याच्या तहसीलदार वर्षा मनाळे, तहसील मध्ये निवडणुकीची प्रक्रिया नीट व्हावी यासाठी कार्यरत आहेत. माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीच्या सदस्य सचिव तथा मीडिया कक्षाच्या प्रमुख अंजू निमसरकर या माध्यमांवर करडी नजर ठेवून आहेत माध्यमात येणाऱ्या आचारसंहिता भंगाच्या तसेच पेड न्यूज संदर्भातील बातम्यांवर वॉच ठेवून आहेत.

यासह तहसीलदार तेजस्विनी जाधव आणि सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती वसुधा रघातटे या ही निवडणुकीच्या जबाबदाऱ्या कर्तव्यपूर्णरित्या पार पडत आहेत. याशिवाय विविध विभागातील निवडणुकीची प्रक्रिया पार पडणाऱ्या अधिनस्ताच्या आदेशाचे काटेकोरपणे महिला कर्मचारी पालन करीतआहेत. या सर्व महिला अधिकाऱ्यांनी व महिला कर्मचाऱ्यांनी आवाहन, केले आहे बीड लोकसभा मतदारसंघातील महिलांनी बाहेर पडून आपला मतदानाचा हक्क बजावावा.

जिल्ह्यात १५ मे रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

बीड । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने होणा-या रॅली, सभा व दि. १३ मे २०२४ रोजी लोकसभेचे मतदान,दि. १४ मे २०२३ रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी होणार असून जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेची शक्यता नाकारता येत नाही. कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ-मुंडे यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक ३ मे २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १५ मे २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे.

पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागू राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

४० वर्षांच्या प्रदिर्घ सेवेनंतर मुहम्मद मुस्लीम कबीर सेवानिवृत्त

लातूर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील औसा तालुक्यात असलेल्या हज़रत सुरत शाह उर्दू शाळेचे शिक्षक मुहम्मद मुस्लीम कबीर यांनी अध्यापन क्षेत्रात ४० वर्षे कर्तव्य बजावले. नियत वयोमानानुसार ते दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. यावेळी फ़खधरुद्दीन अली अहेमद एज्युकेशन सोसायटीचे अल्हाज शेख मुहम्मद उर्फ छोटे मियाँ, ॲड. समीउद्दीन पटेल, मुख्याध्यापक मुहम्मद शफीउद्दीन पटेल, झाकीर जरगर, डॉ. वहीद कुरेशी यांनी मुहम्मद मुस्लीम कबीर यांच्या शैक्षणिक, पत्रकारितेतील आणि सामाजिक योगदनाबद्दल मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन शेख मुजीब शब्बीर आणि आभार बदीउद्दीन पटेल यांनी मानले. शाळेतर्फे कबीर सरांना भेट वस्तू मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी मुहम्मद अब्दुल गनी सर, कु.रजिया बाजी, कु.शेख एम.एम.बाजी, शबाना मुंगले बाजी, शगुफ़्ता मन्यार बाजी, यासिर अराफत काझी, नजीबुद्दीन पटेल, जिलानी काझी व इतर मित्र उपस्थित होते.

ऑर्बिट इंग्लिश स्कूलचे सचिव ॲड. इक्बाल शेख, अझीम ज्युनिअर कॉलेजचे पर्यवेक्षक डॉ. खलील सिद्दीकी, सोलापूरचे सुप्रसिद्ध पत्रकार अय्युब नल्लामंदु, उस्मानाबादच्या शिक्षक संघाचे खिजर मोरवे, लातूरचे सुप्रसिद्ध पत्रकार शेख अब्दुस्? समद, जिलानी मुल्ला राज, उर्दू शिक्षक मुहम्मद शरीफ हन्नुरे आणि संस्थेच्या इतर मित्रांनी लेखांच्या माध्यमातून मुहम्मद मुस्लीम कबीर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, पत्रकारितेतील आणि साहित्यिक सेवा यापुढेही सुरू ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. यावेळी हिंदी साप्ताहिक लातूर रिपोर्टरचे संपादक मज़हर पटेल आणि कार्यकारी संपादक ॲड. इक्बाल शेख यांनी सांगितले की, मुस्लीम कबीर यांचे सार्वजनिक जीवन आणि सेवा यावर आधारित विशेषांक लवकरच प्रकाशित करण्यात असल्याचे म्हटले.

बाल न्याय प्रणाली आणि बाल हक्क संरक्षण कायद्याविषयी जनजागृती कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक ०३ मे २०२४ रोजी सकाळी ०८००ः वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत आनंद एल. यावलकर साहेब, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ''बाल न्याय प्रणाली आणि बाल हक्क संरक्षण या विषयी देव ग्रुप क्लासेस बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात बाल न्याय प्रणाली आणि बाल हक्क संरक्षण या विषयावर बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. जी. सोनी साहेब यांनी बालकांसाठी असलेल्या कायदयाविषयी व त्यांच्या अधिकाराविषयी माहिती सांगितली व कार्यक्रमाची प्रस्तावना केली. मुलांनी धोका वेळीच ओळखावा व स्वतःचे संरक्षण करावे असे सांगितले. सध्याच्या युगात मोबाईल मधुनही बालकांचे मनावर परिणाम होऊ शकतो व त्यांना सहज रित्या इतरत्र गुंतविले जावू शकते असेही त्यांनी सांगितले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,बीड

सदर कार्यक्रमास उपस्थित टी.ए. आसरकर, अध्यक्षा, बाल न्याय मंडळ, बीड यांनी माहिती सांगताना बाल विवाह प्रतिबंध कायदा, बाल मजुरी प्रतिबंधक कायदा तसेच बालकांवर घरामध्ये किंवा इतर ठिकाणी होणाया अन्यायाला बालकांनी कायदा हातामध्ये न घेता कशा प्रकारे सामोरे जावे हे सांगितले. मुलांकडुन गुन्हा झाला तर त्यांना बाल न्याय मंडळामार्फत त्याची चैकशी बाल स्नेही पद्धतीने केली जाते असे सांगितले. विकास, संरक्षण, शिक्षण व इतर अधिकारांबाबत मुला-मुलींना तज्ञांसारखी माहिती दिली. विधीदूत अशोक तांगडे यांनी आपल्या भाषणात मुलींना व मुलांना कायद्यापुढे श्रीमंत असो किंवा गरीब सर्वांना कायदा समान आहे असे सांगितले. समाजात होणारे बालविवाह रोखणे गरजेचे आहे. आपल्या गावात गल्लीत बालविवाह होणार असेल, होत असेल तर सर्वांनी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर फोन करून बालविवाह रोखण्याच्या कार्यात सहभागी झाले पाहिजे व आपला बीड जिल्हा बालविवाह मुक्त जिल्हा निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. बालविवाह निर्मूलनाच्या कार्यामध्ये आपण योगदान दिले पाहिजे असे विधीदूत तत्वशील कांबळे यांनी मुलांना मार्गदर्शन करताना म्हणाले. तसेच त्यांनी मुलांना उपस्थितांनी सांगतलेल्या माहितीवर काही प्रश्न-उत्तरे विचारली व त्यांना बोलके केले. कार्यक्रमाची सांगता करताना देव ग्रुप क्लासेसचे संचालक दिपक मुळे यांनी मुलांविशयी व त्यांच्यातील गुणदोषांविषयी त्यांच्यामध्ये असलेल्या चांगल्या किंवा वाइट प्रवृत्तीची कारणे थोडक्यात सांगितली व आभार प्रदर्शन केले. सदरील कार्यक्रम सर्वांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

थोडक्यात

निरीक्षणगृहात ध्वजारोहण संपन्न

बीड : महाराष्ट्र दिनाच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह, महीला व बाल विकास विभाग येथे जिल्हा अधिक्षक मन्सुरी अन्सार निसार अहमद यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण कार्यक्रमात बीडचे बाल कल्याण समीतीचे अध्यक्ष अशोक तांगडे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच बाल कल्याण समीतीचे सदस्य तत्वशिल कांबळे, छाया गडगे बालीका सिंधीकुमठे शिक्षीका, दिलीप महालंके लिपीक, यांच्यासह कर्मचारी व बालके उपस्थीत होते.

खर्च निरीक्षक ४,८ व १२ मे ला करणार निवडणूक लेखांची तपासणी

बीडः निवडणूक खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे ४, ८ व १२ मे ला निवडणूक लेखांची तपासणी करणार आहेत. अशी माहिती निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाच्या वतीने कळविण्यात आले आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुकीमध्ये उभे राहणाऱ्या उमेदवारांना केलेल्या खर्चाची लिखित नोंद ठेवावी लागते. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार या लेखांची तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याकडून केली जाते. यासंदर्भातले प्रशिक्षण मंगळवारी घेण्यात आलेले आहे. उमेदवारांना नोंदवही दिलेली असून त्यांनी हा खर्च व्यवस्थित रित्या लिहिलेला आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी ४, ८ व १२ मे ला निवडणूक लेखांचे तपासणी खर्च सनियंत्रण कक्ष ३९ बीड लोकसभा मतदारसंघ राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र () जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी १० ते सांय. ५ वाजता खर्च निरीक्षक सुसांता कुमार बिस्वास हे करणार आहेत.

आंबेडकरी अनुयायांनी बौद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा :कागदे

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील प्रचलित धर्माचा अभ्यास केला होता. त्यामध्ये बौद्ध धम्माने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना प्रभावित केले होते. बौद्ध धम्मातील जातीभेद, उच्च, निच्च अस्पृश्यतेला थारा नव्हता. या धम्मात सर्व मानव समान होते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केल होती. मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूर मुक्कामी आपल्या लाखो अनुयायांना सोबत घेऊन बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन बौद्ध धम्माचा स्वीकार केला. बौद्ध धम्माचा प्रसार करण्यासाठी व धम्म चळवळी गतिमान करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त शिवणी, चौसाळा या गावी आयोजित जयभीम महोत्सवात पप्पू कागदे बोलत होते.

उपस्थितांना संबोधित करताना पप्पू कागदे म्हणाले की, धर्म हा केवळ कायदा किंवा आज्ञा नसाव्यात ज्या क्षणी धर्माचे रूपांतर कायद्यात होते त्या क्षणाला तो धर्म भ्रष्ट होतो. खऱ्या अर्थानं धर्म धार्मिक संकल्पनेचा गुणच मारून टाकतो. जीवन आणि वास्तव यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि विचारात बदल करणे म्हणजेच धर्मांतर ही बाबासाहेबांची भूमिका होती. म्हणूनच दया, क्षमा, शांती, करुणेचा संदेश देणाऱ्या भगवान गौतम बुद्धाच्या धम्माची नागपूर मुक्कामी दीक्षा घेऊन सारा भारत बौद्धमय करण्याचा संकल्प केला. आगामी काळात बौद्ध धम्माचा प्रसार करून बौद्ध धम्मास गतिमान करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन पप्पू कागदे यांनी केले. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, बाबू लोढा, बापू पवार, अविनाश जोगदंड, अंकुश कळासे, काकासाहेब जोगदंड, बाबासाहेब चव्हाण, किशोर ढोकणे , अजमेर मनियार, विवेक कुचेकर, हौसराव वाघमारे, विजय शिंदे, रोहित जावळे, रवींद्र पवार, प्रवीण सोनवणे, पंकज रुपवते, पप्पू चव्हाण, अमोल जावळे, सागर चव्हाण, दीपक मस्के, पवन घोडके, प्रमोद रूपवते, साहिल चव्हाण, विजय चव्हाण, किशोर वाघमारे, बाळू पवार, कुमार पवार, नकुल चव्हाण आदी उपस्थित होते.

संत तुकाराम मंदिर तळेगाव येथे निवासी संस्कार शिबिराचे आयोजन

२१ दिवसांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरापासून जवळ तळेगाव काकडहिरा दरम्यान असणाऱ्या जगद्गुरु संत श्री तुकोबाराय सेवापीठ तथा संत तुकाराम महाराज मंदिर येथे यावर्षी निवासी वारकरी संस्कार शिबीर आयोजित करण्यात आले आहे. दिनांक ५ मे २०२४ ते २५ मे २०२४ या कालावधीमध्ये इयत्ता पाचवी ते आठवी या वर्गातील म्हणजे वय वर्ष ११ ते १४ या वयोगटातील एकूण ४० विद्यार्थ्यांना या संस्कार शिबिरासाठी प्रवेश दिला जाणार आहे.

शिबीरामध्ये सकाळी व्यायाम, स्नान, स्तवन, ज्ञानेश्वरी अध्ययन, तुकोबारायांच्या गाथेचा अभ्यास, शब्द भेंड्या, शंका समाधान, प्रवचनातून प्रबोधन, हरिपाठ, मैदानी खेळ या पद्धतीने वारकरी सांप्रदायिक संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले जाणार आहेत. दि. ५ मे २०२४ रोजी सकाळी १० वाजता दैनिक झुंजारनेताचे संपादक अजित वरपे, दैनिक प्रजापत्राचे संपादक सुनील क्षीरसागर, प्राचार्य जे.एम. पैठणे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या संस्कार शिबिराचे उद्घाटन होणार आहे. विद्यार्थ्यांना संत साहित्याची गोडी लागावी, विद्यार्थ्यांची मोबाईल पासून सुटका व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड, अहंगंड, भयगंड जाऊन आत्मविश्वास निर्माण करणे, सामूहिक जीवन जगण्याची गोडी लावणे, नाम चिंतनाची सवय लावणे, मानसिक, शारीरिक, भावनिक, बौद्धिक, धार्मिक, परमार्थिक व आध्यात्मिक क्षमतांचा विकास करणे असे भव्य उद्दिष्ट ठेवून सदरील प्रशिक्षणाचे आयोजन तुकोबाराय किंकर ह.भ.प. प्राचार्य परशुराम महाराज मराडे यांनी केलेले आहे. या प्रशिक्षणा दरम्यान श्रीकृष्ण उबाळे, आचार्य सुधाकर शिंदे, प्रशांत पवळ, त्रिंबक मातकर, डी.जी. तांदळे, आर.एल. कदम, संतोष डोंगरे, पांडुरंग आबा पवळ, भाऊसाहेब धांडे, माधव डाके, श्री गवते यांची संत चरित्रावर कथा सांगणार आहेत. तसेच गायनकल राजाराम घोलप, दिगंबर पांडुळे पाहणार आहेत तर वादनकल मच्छिन्द्र गोरे हे पाहणार आहेत. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या वारकरी संस्कार शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन जगद्गुरु तुकोबाराय सेवापीठातर्फे करण्यात येत आहे.

जाहीरनामा

धारूर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायधीश क-स्तर धारूर
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १३९/२०२४
श्रीकसन व इतर वि निरंक

मयताचे नाव शिवाजी पि. शामराव फुटाणे रा. आरणवाडी ता धारूर जि. बीड हे दिनांक १४/११/२०२३ रोजी मयत झाले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार १. श्रीकिसन पि, शिवाजी फुटाणे रा. आरणवाडी ता धारूर जि. बीड २. राधकीसन पि, शिवाजी फुटाणे रा. आरणवाडी ता धारूर जि. बीड ३. श्रीमंत पि, शिवाजी फुटाणे रा. आरणवाडी ता धारूर जि. बीड यांनी या न्यायालयास मयत शिवाजी पि. शामराव फुटाणे रा. आरणवाडी ता धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्च्यात अर्जदारस शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व इतर महत्वाच्या काम करिता अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्या पेक्षा अर्जदार सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हे असे समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्यांच्या हककाबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत शिवाजी पि. शामराव फुटाणे रा. आरणवाडी ता धारूर जि. बीड यांच्या वारसाना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०५/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिकयानिशी दिले.
पुढील तारीख १९/०६/२०२४

स्वाक्षरित
धपाटे व्ही.व्ही.
क. लिपिक

शिक्का

स्वाक्षरित
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क-स्तर धारूर

जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३४/२०२४
बप्पासाहेब हरिभाऊ काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड

पहा बप्पासाहेब हरिभाऊ काशिद रा. साक्षाळपिंप्री ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत देवजी बाबाजी काशिद** यांचा दिनांक २०/०६/१९४७ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०२/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०६/२०२४ ही आहे.

मार्फत
ॲड. मिलिंद उबाळे

स्वाक्षरित
तहसिलदार, बीड

जाहीरनामा

मा.श्रीमती एफ.बी. वेग सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ६४३/२०२४
वर्षा वि. निरंक विधीज्ञ व्ही. एम. पवळ

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) वर्षा भ्र. अमित वंजारे, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, २) अनिषा पि. अमित वंजारे, वय १७ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ ३) समिक्षा पि. अमित वंजारे, वय- १० वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क.आई अर्जदार क्र. १ ४) निर्मला बबन वंजारे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, ५) बबन भिकाराम वंजारे, वय- ५५ वर्षे, धंदा- मजुरी, राहणार सर्व- येळंबघाट ता. जि. बीड विरुध्द निरंक वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला. ज्याअर्थी मयत नामे अमित पि. बबन वंजारे हे राहणार येळंबघाट ता. जि. बीड १८/११/२०२३ रोजी येथे मयत झालेले आहेत. येळंबघाट ता. जि. बीड हे दिनांक अर्जदार क. १ ही मयत नामे अमित पि. बबन वंजारे यांची पत्नी असुन अर्जदार क. २ व ३ हया मयताच्या मुली आहेत. तसेच अर्जदार क. ४ व ५ हे मयताचे आई-वडील आहेत. मयत नामे अमित पि. बबन वंजारे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार याना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्याजाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अमित पि.बबन वंजारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमापापत्र देण्यान येईल यानी नोदण्याती सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०६/२०२४ आहे. आज दिनांक ३०/०४/२०२४ गेजी माडो संहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

क लिपीक
सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

जाहिर प्रगटन

बीड येथील श्रीमती. सुनयना एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दि.अर्ज क. ६९३/२०२४
विजयालक्ष्मी जाधव वि. निरंक ॲड. जी.एच. तावरे

अर्जदार १ विजयालक्ष्मी भ्र. पांडुरंगराव जाधव, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. बसस्टेंड मागे, नवजीवन शिक्षक कॉलनी, बीड, ता.जि. बीड. २. राजेश्वर पि. पांडुरंगराव जाधव, वय ४६, धंदा व्यापार, रा. सदर ३. महेश्वर पि. पांडुरंगराव जाधव, वय. ४६, धंदा व्यापार, रा. सदर ४. ज्ञानेश्वर पि. पांडुरंगराव जाधव वय ४४, धंदा नौकरी, रा. सदर. विरूध्द निरंक मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार क. १ ही मयत पांडुरंग पि. यशवंतराव जाधव यांची पत्नी आहे. तसेच अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत मयत नामे पांडुरंग पि. यशवंतराव जाधव यांचा मृत्यु दिनांक २४-०२-२०२४ रोजी पाटोदा, ता. पाटीदा जि. बीड येथे झाला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे पांडुरंग पि. यशवंतराव जाधव, या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरह, मयत नामे पांडुरंग पि. यशवंतराव जाधव रा. पिपरगव्हाण, बीड ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताची कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०२/०५/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले पुढील तारीख १०/०६/२०२४

क.
लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

दैनिक राज्य लोकतंत्र
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
महासंग्राम
शनिवार, दि. ४ मे २०२४
शिवसेना
वंचित बहुजन आघाडी

बजरंग सोनवणेंना निवडणूकीत हाबाडा दाखवणार

आसरडोहमध्ये पंकजाताई मुंडे यांचे रमेश आडसकरांनी केले जबरदस्त स्वागत; पंकजाताईंच्या पाठीशी मतांची ताकद उभी करण्याचा निर्धार

धारुर । प्रतिनिधी

भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे आपल्या जिल्हयाला लाभलेलं एक सक्षम नेतृत्व आहे तर दुसरीकडे समोरचा उमेदवार कोण यापेक्षा त्या उमेदवाराचा अनुभव आपल्या परिसरातील सर्वच लोकांना आलेला आहे, त्याबद्दल वेगळे सांगायची आपल्याला गरज नाही. या निवडणूकीत राष्ट्रवादीच्या बजरंग सोनवणे यांना हाबाडा दाखविल्याशिवाय राहणार नाही अशा शब्दांत भाजप नेते रमेश आडसकर यांनी विरोधकांचा जाहीर सभेत खरपूस समाचार घेतला. दरम्यान आसरडोह येथे काल आडसकर यांनी पंकजाताई मुंडे यांचे जबरदस्त स्वागत केले.

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ गुरूवारी संध्याकाळी आसरडोह येथे झालेल्या पंचक्रोशीतील मतदारांनी मोठी गर्दी केली होती. पंकजाताईंचे गावात आगमन होताच ग्रामस्थांनी एकच जल्लोष करत त्यांचं जबरदस्त स्वागत केले. व्यासपीठावर माधवराव निर्मळ यांचेसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आडसकर म्हणाले, आपल्या जिल्ह्याचा चांगला विकास कोण करु शकतयं याचा विश्वास आपल्याला पंकजाताईंमध्ये दिसतो. मंत्री असताना त्यांनी देशात सर्वाधिक ९५६ कोटींचा विमा जिल्ह्यातील शेतकर्यांना मिळवून देण्याचे काम त्यांनी केले. पिकविमा असेल अतिवृष्टीचे अनुदान असेल, शेतकर्यांना कोणतेही अनुदान देण्याचे काम पंकजाताईंच्या माध्यमातून झाले आहे. अनेक मोठी कामे पंकजाताईंच्या नेतृत्वात यापूर्वी मार्गी लागली आहेत. त्यामुळे भविष्यातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी पंकजाताईच सक्षम नेतृत्व आहेत, याची जाण ठेवून या लोकसभा निवडणूकीत जातीवाद, गट-तट विसरुन एकदिलाने पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मताधिक्य देवून विजयी करा.

आज मोठी लग्नतिथी असतानाही सभेला मोठी गर्दी झाली. याबद्दल आभार व्यक्त करत रमेश आडसकर म्हणाले, पंकजाताई मुंडे यांना आपल्या भागातील सर्व प्रश्न सोडवण्यासाठी मोठ्या मताधिक्याने निवडून द्यायचे आहे. जातीपातीच्या राजकारणासाठी नव्हे तर विकासासाच्या राजकारणासाठी आपण सर्व जण काम करतो आहोत. वेगवेगळ्या माध्यमातून पंकजाताईंनी विकासाची प्रलंबित कामे मार्गी लावलेली आहेत, जिल्ह्यात दुष्काळ पडला त्यावेळी पशूधन वाचवण्यासाठी छावण्या देण्याचे काम पंकजाताई मुंडेंनी केले. कोव्हिड काळातही पंकजाताईंनी सत्ता नसतानाही या भागातील लोकांसाठी मोठे काम केले. धारुरला कोव्हिड सेंटर सुरु केले, याची जाण आपण प्रत्येकाने ठेवली पाहिजे. आता पंकजाताई बीड जिल्ह्याच्या खासदार झाल्या तर जिल्ह्याचा सर्व बाजूने विकास होण्यास मदत होणार आहे, त्यासाठी येत्या १३ तारखेला कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून पंकजाताईंना विक्रमी मताधिक्याने निवडून द्या असं आवाहन त्यांनी केलं .

शेतकरी ऊसतोड आणि कामगार यांचे पैसे देणे ही आमची 'औकात'

बीड । परळी/ प्रतिनिधी

औकात आणि लायकी काय हे विचारणाऱ्या विरोधकांना बजरंग बप्पा सोनवणे यांनी सणसणीत चपराक लगवित म्हटले की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे वेळेवर देणे. ऊसतोड कामगार आणि कारखान्यातील कामगार यांच्या बनकाचे पैसे देणे ही आमची औकात आहे तर ज्यांना वडिलांनी उभे केलेले कारखाने चालविता आले नाहीत. त्याने कामगार व शेतकऱ्यांचे पैसे बुडविले ती त्यांची लायकी काय त्यांनी आमची औकात आणि लायकी काढणे म्हणजे चेष्टा असे अशी कोपरखळी बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्री आणि भाजप उमेदवारांना लगावली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ बजरंग बप्पा सोनवणे, प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, ॲड. अजय बुरांडे, सुदामतीताई गुट्टे, ॲड. माधव जाधव हे परळी तालुक्यातील पौळ पिंपरी, गोवर्धन (हिवरा), हिवरा (गोवर्धन), रामनगर तांडा, जळगव्हाण, रामेवाडी (कासारवाडी), पोहनेर, दिग्रस, बोरखेड, तेलसमुख या गावांना भेटी दिल्या.

पौळ पिंपरी येथे गावकऱ्यांनी ढोल ताशा वाजवून आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे चिन्ह असलेल्या तुताऱ्या वाजवून भव्य स्वागत केले. तर रामेवाडी (कासारवाडी) येथे सजविलेल्या बैलगाडीतून बजरंग बप्पा सोनवणे, बाबनभाऊ गित्ते, फुलचंद कराड आणि राजेसाहेब देशमुख यांची ढोल, ताशा आणि तुताऱ्या वाजवून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी पौळ पिंपरी येथे बोलताना बजरंग बप्पा सोनवणे यांनी पालकमंत्री आणि भाजपच्या उमेदवारांच्या चांगलाच समाचार घेतला ते म्हणाले की एक सामान्य शेतकरी कुटुंबातील शेतकरी पुत्र असून सुद्धा मी दोन दोन साखर कारखाने चालवली तेही मराठवाड्यात विक्रमी भाव देत आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कामगार आणि ऊसतोड मजूर यांचे पैसे आम्ही बुडवीले नाहीत. तसेच आमच्या समर्थकांना जर कोणी धमकावीत असेल तर त्यासाठी आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी राहू. त्याचबरोबर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नसून उलट दोन्ही कारखाने

◀◀ पान ३ वर

भाजपाला भारतातून हद्दपार करण्याकरिता बजरंग सोनवणे यांना विजयी करावा -प्रा.सुरेश नवले

शहरप्रमुख शेख निजाम यांच्या प्रयत्नाने शिवसेना शहरात बाप्पाना आघाडी देणार-परमेश्वर सातपुते

भावनिकता सोडून विकासासाठी महाविकास आघाडीस मतदान करा- दादासाहेब मुंढे

बीड । प्रतिनिधी

जनतेला विकासाचे अमिष दाखवून नरेंद्र मोदी यांनी देशाच्या वाटोळा केला आहे येत्या निवडणुकीत भाजपा भारतातून हद्दपार होणे गरजेचे असून बीड लोकसभा मतदारसंघाची महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजता माणूस च्या समोरच्या बटन दाबून प्रचंड मतानी विजयी करण्याचे आवाहन माजी मंत्री सुरेश नवले यांनी गांधीनगर येथील अल्कबीर हॉल या ठिकाणी शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शहर प्रमुख शेख निजाम यांच्या वतीने आयोजित बजरंग सोनवणे यांचे प्रचार निमित्त कॉर्नर बैठकीत केले यावेळी काँग्रेस चे माजी आमदार सिराज देशमुख ,दादासाहेब मुंढे, शिवसेना चे बीड जिल्हा प्रमुख गणेश वरेकर,परमेश्वर सातपुतेसर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार चे प्रदेश उपाध्यक्ष केके वडमारे, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे

समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरूल ईमान, सभे चे आयोजक शिवसेनेचे शहर प्रमुख शेख

◀◀ पान ३ वर

अपक्ष उमेदवार राजेंद्र होके पाटील यांनी घेतल्या नवीन मोंढ्यात व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी

माजलगाव । प्रतिनिधी

बीड ३९ लोकसभेचे अपक्ष उमेदवार राजेंद्र होके पाटील यांनी शुक्रवार रोजी सकाळी अकरा वाजता नवा मोंढा परिसरामध्ये व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत नेहमी तुमच्या मी पाठीशी राहत आहे. यापुढेही राहणार असल्याचा शब्द राजेंद्र होके पाटील यांनी मोंढ्यातील व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी प्रसंगी दिला.यावेळी मोंढा परिसरातील व्यापाऱ्यांनी राजेंद्र होके पाटील यांच्या पाठीशी राहणार असल्याची ग्वाही दिली.

बीड लोकसभा चे अपक्ष उमेदवार राजेंद्र होके पाटील यांनी शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता नवीन मोंढा भागातील अडत व्यापाऱ्यांचा भेटी घेतल्या. नवीन मोंढा परिसरामध्ये व्यापाऱ्यांची कोणी फसवणूक केली किंवा या भागात चोरी झाली कसल्याही प्रकारची अडचण आली तर व्यापारी सर्वप्रथम राजेंद्र होके पाटील यांना सांगतात. या ठिकाणी झालेल्या अनेक व्यापाऱ्यांच्या होत असलेल्या त्रासासाठी राजेंद्र होके पाटील धावून जात व्यापाऱ्यांना बळ देतात. या सह गोरगरिब लोकांच्या अडीअडचणीला नेहमी धावून जातात या कामाच्या जीवावर राजेंद्र होके पाटील यांनी शुक्रवार रोजी मोंढा भागातील सर्व व्यापाऱ्यांची गाठीभेटी घेऊन लोकसभेचे उमेदवार दोन्हीही आपल्या कसल्याच कामाचे नसून ते तुम्हच्या कधीही कामाला येणार नाहीत ते साधे तुम्हचे फोण घेत नाहीत. यासाठी तुम्ही या वेळेस आपले बहुमोल मतदान करून मला लोकसभेमध्ये पाठवा असे आवाहन राजेंद्र होके पाटील यांनी केले. यावेळी मोंढा परिसरातील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दानवे खोतकर भेटीने चर्चेला उधान

जालना । प्रतिनिधी

जालना लोकसभेचे महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी शुक्रवारी सकाळी शिवसेना शिंदे गटाचे नेते अर्जुन खोतकर यांची घरी जाऊन भेट घेतली. अर्जुन

खोतकर गेल्या काही दिवसांपासून दानवे यांच्या प्रचारापासून अंतर राखून आहेत. त्यामुळे राजकीय भूवया उंचावल्या होत्या. या भेटीने दोघांमधील वाद संपुष्टात आल्याचे बोलले जात असले तरी अर्जुन खोतकर यांनी भेटीनंतरही दोन दिवसांचा अवधी मागितल्याचे सांगत सस्पेन्स अजूनही कायम ठेवला आहे. दुसरीकडे, अर्जुन खोतकर उद्यापासून प्रचारात सक्रिय होतील, असा दावा रावसाहेब दानवे यांनी केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून अर्जुन खोतकर रावसाहेब दानवे यांच्यावर नाराज होऊन स्वत:ला दानवे यांच्या प्रचारापासून दूर ठेवत असल्याचे चित्र मतदारसंघांमध्ये आहे. शुक्रवारी सकाळी दानवे यांनी खोतकर यांच्या दर्शना या निवासस्थानी भेट दिली. दानवे यांनी खोतकर यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. अर्जुन खोतकर यांनी दानवे यांनी घरी येऊन भेट घेतल्यानंतर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, रावसाहेब दानवे घरी आले होते. त्यांनी प्रचारामध्ये येण्याची विनंती केली आहे. मी त्यांच्याकडे दोन दिवसांचा अवधी मागितला असून वरिष्ठ पातळीवर चर्चा करुन अंतिम निर्णय घेणार आहे. आमची चर्चा चांगली झाल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, मी नाराज नाही, मला पक्षाने वाशिम, यवतमाळ आणि संभाजीनगरची जबाबदारी दिली आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी सांभाळावी लागते. या भेटीमध्ये आम्ही नाराजीवर बोललो, तसेच काय नाराजी असल्याचे त्यांना सांगितले असून वरिष्ठांशी बोलून निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.

कल्याण लोकसभेसाठी ठाकरे गटात बंडखोरी?

कल्याण । प्रतिनिधी

कल्याण लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीत राजकीय भूकंपाचा ज्वालामुखी फुटू लागला आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गट विरोधात शिवसेना शिंदे गट यांच्यातील प्रतिष्ठेच्या अटीतटीच्या महासंग्रामाला सुरूवात झाली आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर व शिवसेना शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे निवडणूक रिंगणात उतरले असतानाच उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी शुक्रवारी (दि.३) शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे कल्याण डोंबिवलीचे माजी महापौर रमेश जाधव यांनी ऐनवेळी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीच्या महासंग्रमात ट्विस्ट आला आहे.

कल्याण लोकसभा मतदार संघाची निवडणुकीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे. शिवसेना उध्दव ठाकरें गटाच्या वतीने वैशाली दरेकर यांनी महविकास आघाडीची उमेदवारी घोषित केल्या नंतर शिवसेना शिंदे गटाने डॉ. श्रीकांत शिंदे यांना निवडणूक रिंगणात उतरविले आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर यांनी निवडणूक प्रचाराला सुरूवात केल्यापासून

रमेश जाधवांचा अपक्ष अर्ज दाखल

णूक २०२४
ातपुते
धिकारी

प्रचारात विश्वासात घेतले जात नसल्याचे डोंबिवलीतील ठाकरे गटातील पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाचे डोंबिवली शहर प्रमुख यांच्यासह महिला पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने ठाकरे गटाला धक्का बसला होता. त्यांच्या प्रवेशानंतर अखेरच्या दिवशी मोठा स्फोट होणार यासारख्या चर्चा रंगल्याने पुढील चाल कोणती असणार, काय मोठी खेळी खेळली जाणार? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. ठाकरे गटाच्या उमेदवाराला शह देण्याचा प्रयत्न विरोधकांकडून सुरु असल्याची कुणकुण लागली होती. त्यामुळे पक्षश्रेष्ठींकडून प्रसंगावधान राखून अखेरच्या क्षणी कल्याण डोंबिवलीतील उबाठाचे निष्ठावंत शिवसैनिक रमेश जाधव यांना अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरण्यासाठी सांगण्यात आले.

अबकी बार मोदी- शहा की महागाई सरकार हद्दपार - जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे

केज । प्रतिनिधी

उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी महाविकास आघाडी बीड लोकसभा उमेदवार मा बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चिंचोली माळी सर्कल मध्ये बैठकाचा झंझावात प्रचारात तालुका प्रमुख अशोक जाधव युवा सेना तालुका प्रमुख किशोर घूले तालुका समन्वयक लक्ष्मन गलांडे सह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते यावेळी बोलतांना उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी म्हटले की कुठलाही राजकीय वारसा नसताना सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील उमेदवार म्हणून बजरंग

बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ झंझावाती दौरा

बप्पा सोनवणे यांना पसंती मिळत आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी म्हटले व बजरंग बप्पा सोनवणे यांची मराठा, धनगर, मुस्लिम आरक्षणासह संविधान वाचविण्याची भूमिका, प्रत्येक तालुक्यात रोजगार निर्मितीसाठी नवीन प्रकल्प आणणे, रेल्वे मार्गाचे काम पूर्ण करणे ही कामे प्राधान्याने करण्याचे त्यांचे धोरण, कांदा, कापूस, सोयाबीन, तूर, हरबरा या पिकांवरील निर्यातबंदी उठवून शेतकऱ्यांना हमीभाव व शेतीमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी आवाज उठवून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडविणे हा त्यांचा ध्यास असल्याची भूमिका मतदारांसमोर प्रचारात शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे मांडत आहेत. तर रत्नाकर शिंदे बोलताना असे सुध्दा म्हटले की राज्याच्या आणि देशाच्या विकासात शरदचंद्र पवार यांचा असलेला सिंहाचा वाटा, देशात सर्वांना समान संधी व समान न्याय मिळावा म्हणून काँग्रेस पक्षाची भूमिका तर राज्यात अडीच वर्षाच्या कार्यकाळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना सारख्या महामारीत हाताळलेला परिस्थिती. या गोष्टीचा विचार करीत इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पाठीशी मतदार उभे राहून प्रचंड बहुमताने मानुसधरी तुतारी समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने बजरंग सोनवणे यांना निवडून द्यावे असे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी प्राचार दौऱ्यात म्हटले आहे.

पंकजाताईंची गॅरंटी जिल्ह्याने बघितली; विकासाची नवी उंची गाठण्यासाठी मत द्या-खा. प्रितमताई मुंडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे या राज्याच्या ग्रामविकास मंत्री आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना त्यांच्या विकासाची गॅरंटी आपण सर्वांनी बघितली आहे. त्यांच्या काळात सुरु झालेली विकासाची प्रक्रिया पुढे निरंतर सुरु ठेवण्यासाठी आणि विकासाच्या नवी उंची गाठण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना मत दया' असे आवाहन खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांनी मतदारांना केले.

भाजप आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारानिमित्त खा.प्रितमताई मुंडे यांनी अंबाजोगाई तालुक्यातील चनई जिल्हा परिषद गटात झंझावती दौरा केला. चनई, उमराई, धावडी, केंद्रेवाडी, लाडेवडगाव येथील मतदारांशी त्यांनी संवाद साधला. आपल्या बीड जिल्ह्याच वैशिष्ट्य आहे, जिल्ह्यातील मतदार नेहमी विकासाला प्राधान्य देतात. हा आपल्या लोकांचा दृष्टिकोन आहे, लोकांचा हा दृष्टिकोन कायम राहावा ही आपली जवाबदारी असल्याचे खा.मुंडे म्हणाल्या.

बीड लोकसभा मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवन ही आपली गरज आहे. पुढील पिढ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून आपलं एक मत बीड जिल्ह्याच्या विकासाला, सुबकतेला, सुसंस्कृतपणाला, सामाजिक सलोख्याला आणि बीड जिल्ह्याच्या सुजलाम सुफलामतेच्या धोरणाला म्हणून पंकजाताई मुंडे यांना द्या,निश्चित आपल्या विश्वासाला सार्थ ठरवून बीड जिल्ह्याच्या विकासाची नवी उंची आपण गाठू अस त्या म्हणाल्या. दरम्यान केजच्या आ. नमिता मुंदडा, बालासाहेब दौडतले, नारायणराव केंद्रे, शंकर उबाळे, हिंदुलाल काकडे, कमलाकर कोपले, सतीश केंद्रे, दीपक शिंदे, सचिन शेप, सचिन फड, महेश शेप, राहुल राख यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

शहरी भागातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी गृहनिर्माण संस्थांचा सहभाग आवश्यक -जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

पुणे : जिल्ह्यात मतदार जागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात येत असून शहरी भागातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी गृहनिर्माण संस्थांचा सहभाग आवश्यक आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये पदाधिकारी आणि सदस्यांनी जास्तीत जास्त मतदार जागृती करावी असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे, सहकारी गृहनिर्माण संस्था पुणे शहर जिल्हा उपनिबंधक व जिल्हा उपनिबंधक (ग्रामीण) प्रकाश जगताप, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन तसेच पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील विविध गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले, जिल्ह्यात गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटचे प्रमाण अधिक असून तेथील मतदारांची संख्या अधिक आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत अधिकाधिक मतदान होण्याच्यादृष्टीने ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मतदारांना मतदान केंद्राची माहिती होण्यासाठी तयार करण्यात आलेला क्यूआर कोड संस्थेच्या दर्शनी भागात लावण्यात यावा. मतदार ओळख पत्र आणि मतदार ओळख चिठ्ठी देण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना पदाधिकाऱ्यांनी सहकार्य करावे. सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी समन्वय ठेऊन जास्तीत जास्त गृहनिर्माण संस्थामध्ये मतदान होईल यासाठी प्रयत्न करावेत.

मतदारांच्या सुविधेसाठी 'नो युवर पोलींग स्टेशन' उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच मतदारांना हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. लवकरच मतदान केंद्रांची माहिती देण्यासाठी मोबाईल पची सुविधा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. नगरपालिका क्षेत्रातही स्थानिक यंत्रणेमार्फत मतदान वाढीसाठी प्रयत्न करावेत. मतदार नोंदणी झालेल्या जास्तीत जास्त मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करावे, असे आवाहनही डॉ. दिवसे यांनी केले.

सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या नोटिसा

पुणे । प्रतिनिधी

बारामती लोकसभा मतदारसंघातील निवडणूक खर्चाच्या दुसऱ्या तपासणीत आढळलेल्या खर्चाच्या तफावतीवरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी नोटीस बजावली आहे. दोन्ही उमेदवारांना दोन दिवसांत खुलासा देण्यास सांगण्यात आले आहे. नोटिशीवर आक्षेप असल्यास उमेदवारांना जिल्हा निवडणूक निरीक्षण समितीकडे दाद मागण्याचा अधिकार आहे. खुलासा अयोग्य असल्यास प्रशासनाला समितीकडे जाण्याचा अधिकार असल्याचे द्विवेदी म्हणाल्या.

मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाची दुसरी तपासणी बुधवारी (दि. १) झाली. त्यात सर्व ३८ उमेदवारांनी सादर केलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचा २८ एप्रिलपर्यंतचा खर्च २९ लाख ९३ हजार ३१ रुपये इतका आहे. उमेदवाराच्या खर्च प्रतिनिधीने सादर केलेल्या खर्चाशी निवडणूक अधिकाऱ्यांनी शेंडो रजिस्टरशी तुलना केल्यावर त्यात ९ लाख १० हजार ९०१ रुपयांची तफावत आढळली. यामुळे पवार यांना नोटीस बजावण्यात आली आहे. ती उमेदवाराच्या प्रतिनिधीने अमान्य केली आहे. उमेदवारांची पहिली खर्च तपासणी २५ एप्रिलला झाली. त्यात ३८ पैकी ४ उमेदवारांनी खर्च सादर केला नव्हता. जिल्हा निवडणूक निरीक्षण समितीकडे उमेदवारांना दाद मागता येणार आहे, असे कविता द्विवेदी म्हणाल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांचा २८ एप्रिलपर्यंत एकूण खर्च ३७ लाख २३ हजार ६१० इतका झाला आहे. खर्च प्रतिनिधीने सादर केलेल्या खर्चाशी निवडणूक अधिकाऱ्यांनी शेंडो रजिस्टरशी तुलना केल्यावर त्यात १ लाख ३ हजार ४४९ रुपयांची तफावत आढळली. ही तफावत उमेदवाराच्या प्रतिनिधीने अमान्य केली आहे. याबाबतचा खुलासा पुढील ४८ तासांत देण्याचे सांगण्यात आले आहे. खुलासा न आल्यास तफावत मान्य असल्याचे समजून ती उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यात येईल.

संतोष घोणे यांना फ्रांसच्या विद्यापीठाची पीएचडी प्रदान

पिंपरी(प्रतिनिधी) निगडी येथील संतोष घोणे यांना दि थेम्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी पॅरिस फ्रांस या विद्यापीठाने पीएचडी पदवी बहाल केली. श्री घोणे यांनी बिझनेस मॅनेजमेंट रेफरन्स ह्युमन रिसोर्स ड फॅसिलिटी सर्व्हिसेस या क्षेत्रामध्ये डॉक्टरेट पदवी मिळवली . थेम्स विद्यापीठातून श्री संतोष घोणे हे या विषयामध्ये पदवी मिळविणारे भारतातील उद्योजक आहेत. यासाठी प्रा. राकेश मित्तल यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

थायलंड येथे झालेल्या आशिया- पॅसिफिक शैक्षणिक परिषदेत, आदीपू विद्यापीठाचे प्रमुख डॉ जिदप्पा थेवारिन, थेम्स विद्यापीठाचे कॅडमीक संचालक डॉ इर्विन डेलीन टोरस यांच्या हस्ते हि पदवी बहाल करण्यात आली.

श्री. संतोष घोणे यांना आशिया पॅसिफिक एज्युकेशन समीट मध्ये आशिया आयकॉनिक पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री संतोष घोणे तिरुपती ग्लोबल फॅसिलिटी मॅनेजमेंट चे चेअरमन असून ते ह्युमन रिसोर्सेस या क्षेत्रात गेली ३२ वर्षांपासून कार्यरत आहे. त्यांनी आजतागायत ३०० कंपन्यांना सुमारे ६ हजार कुशल कामगार पुरवठा केला आहे. तसेच ते औद्योगिक कामगार सेवा, सुरक्षा सेवा, कामगार संपर्क आणि प्लेसमेंट सेवा पुरवठा करत आहेत.

EDUCONNECT
Global Human Rights Council For Peace & Sustainable Development
2024 ASIA PACIFIC EDUCATION SUMMIT
ASIA ICONIC A
Asia Pacific Summit
Global Economic Development
The Thames Inter onal ersity
Honorary Doctor Award
Alumni Meet
ASSOCIATE CONSULTING PARTNER
RI ACADEMICS

यावेळी श्री.घोणे म्हणाले की, औद्योगिक क्षेत्रात कंपनी मालक आणि कामगार यांच्यात समन्वय असायला पाहिजे. कुशल कामगारांना नोकरीची संधी मिळत नाही. ज्या कामगारांना नोकरीची संधी मिळते त्यांना कंपनीकडून खूपच अपेक्षा आहेत. यामुळे कामगार आणि औद्योगिक क्षेत्र यांच्यात मोठी दरी निर्माण झालेली आहे.

कामगारांसाठी असलेली तळमळ, उत्तम समन्वय साधण्याची वृत्ती, कामाचा प्रदीर्घ अनुभव, माणसे जोडण्याची कला आणि समाजाप्रतीची बांधिलकी या श्री घोणे यांच्या गुणांचा या यशामध्ये मोठा वाटा आहे.

महावितरण क्षेत्रातील 'पवार पॅटर्न' आदर्श ठरावा : डॉ. श्रीपाल सबनीस

आडकर फौंडेशनतर्फे राजेंद्र पवार यांचा जिद्द जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

पुणे : सद्य परिस्थितीत आदर्श राजकारण संपलेले आहे. राजकीय व्यवस्था नकारात्मकतेला पूरक आणि लोकशाहीला बळकटी न देणारी आहे. अशा नकारात्मक वातावरणात सकारात्मकतेने सेवाभाव, जिद्द, ध्यासाची भूमिका राजेंद्र पवार यांनी घेतली आहे. बेईमान काळात लोककल्याणार्थ विधायक कार्य करीत इमानदारीचे महत्त्व पटविणारे पवार हे कर्तव्यनिष्ठ अधिकारी आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. महावितरणच्या क्षेत्रात ध्येयासाठी जिद्दीने कार्यरत असणाऱ्या राजेंद्र पवार यांचा 'पवार पॅटर्न' आदर्श ठरावा, अशा सदिच्छाही त्यांनी व्यक्त केल्या.

आडकर फौंडेशनतर्फे यंदाच्या जिद्द जीवनगौरव पुरस्काराने महावितरणच्या पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांचा शुक्रवारी (दि. ३) गौरव करण्यात आला. पुरस्काराचे वितरण डॉ. सबनीस यांच्या हस्ते झाले त्या वेळी ते बोलत होते. पत्रकार भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आडकर फौंडेशनचे अध्यक्ष ड. प्रमोद आडकर यांच्यासह ज्ञान फौंडेशनेचे अध्यक्ष मनोहर कोलते, महाराष्ट्र आर्थिक महामंडळाचे उपाध्यक्ष सचिन इटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.सुरुवातीस प्रास्ताविकात ड. प्रमोद आडकर यांनी जिद्द जीवनगौरव पुरस्कारामागील भूमिका विशद करत जिद्द माणसाला शून्यातून उच्च ध्येयाकडे घेऊन जाते. अशीच वाटचाल पवार यांची असून त्यांच्या कार्याचा गौरव पुरस्काराच्या माध्यमातून करण्यात येत आहे, असे सांगितले. चैतन्यदायी नेतृत्व कणाकणात बाळगत, सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणारे निष्कलंक, निस्वार्थी, निरलस समाधानी सरकारी अधिकारी पवार होत, असे गौरवाने नमूद करून डॉ. सबनीस पुढे म्हणाले, अनेक समाजसेवी संस्थांना मदत करत पुण्याची पेरणी करणारे, उदारमतवादी भूमिका सांभाळणारे तसेच सामान्यातील असामान्यत्व ओळखणारे असे पवार यांचे व्यक्तीमत्त्व आहे. महावितरणसारख्या रुक्ष विभागात अधिकारी म्हणून कार्यरत असताना कर्मचाऱ्यांची क्रीडा, कला, सांस्कृतिक भूक भागविणारे, लोककल्याणार्थ सतत कार्यरत असणारे पवार संविधानात्मक संस्कृतीचे, तसेच राष्ट्रपुरुषांच्या चांगुलपणाची बेरीज आपल्या कार्यातून प्रवाही ठेवत आहेत.

महावितरणचा विकासात्मक आराखडा विशद करून सत्काराला उत्तर देताना राजेंद्र पवार म्हणाले, अनेक अडचणींवर मात करत अतिशय सकारात्मकतेने, पारदर्शकतेने, कर्मचाऱ्यांच्या साथीने मी माझी ध्येये व उद्दिष्ट्ये जिद्दीने पूर्ण करत आहे. या भूमिकेतूनच ग्राहकांना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी मी बांधील आहे.

सचिन इटकर म्हणाले, महाराष्ट्राला चांगल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची परंपरा लाभली आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सकारात्मक पद्धतीने कार्यरत असणाऱ्या पवार यांच्या यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. शासन जरी अनेक योजना जाहीर करत असले तरी या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रशासनाचा मोलाचा वाटा असतो. पवार यांच्यासारखे अधिकारी प्रशासनात आले तर राज्याचे प्रशासन उत्तम ठरत महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल.राजेंद्र पवार हे सामाजिक बांधिलकी जपणारे अधिकारी असून कर्मचाऱ्यांसाठीही ते आदर्श ठरले आहेत, असे प्रतिपादन मनोहर कोलते यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि सन्मानपत्राचे वाचन शिल्पा देशपांडे यांनी केले.

वायनाडमधून पराभव होण्याच्या भीतीने राहुल गांधींचा रायबरेलीतून लढण्याचा निर्णय –विनोद तावडे

पुणे । प्रतिनिधी

प्रियांका गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवणार हे जवळपास निश्चित झाले होते. पण, गेल्या निवडणुकीत राहुल गांधींना अमेठीत पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्याचा धडा घेत यंदाच्या निवडणुकीत वायनाडमधील चित्र समजून घेतल्यानंतर वायनाडमधील पराभवाच्या भीतीने राहुल गांधींनी रायबरेलीतून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. अशी घणाघाती टीका भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी शुक्रवारी (दि.३) केली.

पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांचा वार्तालापाचे आयोजन केले होते. त्यावेळी तावडे यांनी देशभरातील अनेक राजकीय घडामोडींवर त्यांनी भाष्य केले. यावेळी तावडे यांना राहुल गांधी राहुल गांधी यांनी शुक्रवारी रायबरेलीमधून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, त्याबाबत विचारले असता, तावडे यांनी राहुल गांधींवर निशाणा साधत वायनाडमधील पराभवाच्या भीतीने राहुल गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवत आहेत. अशा शब्दात टीका केली.

मुळचे भाजपचे पण मतभेदानंतर राष्ट्रवादीत गेलेले माजी मंत्री एकनाथ खडसे यांच्या पुन्हा घर वापसीवरुन चांगली चर्चा रंगली आहे. त्यांनी पुन्हा भाजपमध्ये दिल्लीत प्रवेश दिला जाणार असल्याचे खुद्द खडसे यांनीच जाहीर केले होते. मात्र खडसे यांचा अद्याप प्रवेश झालेला नसतानाही त्यांनी लोकसभेचा प्रचार सुरु केला आहे. त्यावर तावडे यांना विचारले असता, खडसेंच्या भाजप प्रवेशाला फडणवीस-बावनकुळे यांचा विरोध नाही. खडसे यांच्या भाजप प्रवेशाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा कोणताही विरोध नाही. असे विनोद तावडे यांनी यावेळी स्पष्ट केले. केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करून राज्यातील निर्णय घेतले जातात. आमच्याकडे टीमवर्क आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटाने युती करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने मते मागितली. मात्र निवडून आल्यानंतर त्यांनी आमचा विश्वासघात केला. शिवसेनेतील ठाकरे गट नं. म्हणून आम्ही आकड्यांकडे गेलो. त्यामुळे त्याला धडा शिकवण्यात आला. देवेंद्र फडणवीस सुडाचे राजकारण करत नाहीत, असेही तावडे यांनी स्पष्ट केले.

देशभरात लोकसभा निवडणुका होत आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या बैठका होत आहेत. या सभांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. एकीकडे आमचे अधिकारी व कार्यकर्ते बूथवर काम करताना दिसतात, तर विरोधी पक्षांना बूथवर अधिकारी व कार्यकर्ते सापडत नाहीत. २० ते ३० टक्के बूथवर विरोधी पक्षाचे कार्यकर्ते नाहीत. आपण कितीही आणि काहीही केले तरी नरेंद्र मोदीच पंतप्रधान होतील, अशी भावना विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यामुळे या वर्षी आपण निश्चितपणे ४०० चा टप्पा पार करू. देशात 'येणार तर मोदी' असे वातावरण आहे, असे तावडे म्हणाले.

जलसंपदा'च्या विरोधात शेतकरी आक्रमक : नारायणगाव कार्यालयासमोर ठिय्या

नारायणगाव । प्रतिनिधी

येडगाव धरणासाठी परिसरातील शेतकर्यांचा मोठा त्याग आहे. बहुतांश शेतकर्यांच्या या धरणामध्ये जमिनी गेल्या आहेत. मात्र, या बाधित शेतकर्यांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन झालेले नाही. त्यातही वेळेवर धरणातून शेतीसाठी पाणी मिळत नाही आणि वीजपंपाचे जोड तोडले जात आहेत, त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकर्यांनी जलसंपदा विभागाच्या नारायणगाव कार्यालयाच्या कार्यकारी अभियंत्यांना खुर्चीवर बसू देणार नाही, असा इशारा दिला आहे, अशी माहिती धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष बाबाजी नेहरकर यांनी दिली आहे.

येडगाव धरणातून कुकडी नदीतून पूर्ण दाबाने पाणी शिरूर नगरपरिषदेच्या हद्दीत पिण्यासाठी नेणे शक्य व्हावे म्हणून धरणालगतच्या सर्व शेतकर्यांच्या कृषी पंपांचे वीजजोड दोन दिवसांपूर्वी नारायणगाव येथील जलसंपदा विभागाने महावितरण कंपनीच्या कर्मचार्यांकडून तोडले. परंतु स्थानिक शेतकरी आक्रमक झाल्याने आणि आमदार अतुल बेनके यांनी मध्यस्थी करत हे वीजजोड जोडून देण्यात आले. तथापि शिरूरला पाणी पूर्ण दाबाने न्यायचे झाल्यास पुन्हा कृषी पंपांचे वीजजोड तोडावे लागेल, अशी माहिती या वेळी उपविभागीय अभियंता आर. जे. हांडे यांनी शेतकर्यांना दिली होती. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकर्यांनी जलसंपदा विभागाच्या नारायणगाव कार्यालय आवारात मंगळवारी (दि. ३०) ठिय्या आंदोलन केले. या वेळी नेहरकर बोलत होते.

सरपंच सीमा भोर, उपसरपंच अंकुश भोर, शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख सह्याद्री भिसे, माजी उपसरपंच हर्षल गावडे, माजी सरपंच देविदास भोर, कांदळीचे माजी उपसरपंच, अनिल भोर, प्रमोद शिंदे, शिवाजी गावडे, सचिन भोर, मोहन हांडे, सुजाता जाधव, नीलम खरात, मधुकर शिंदे, राजू ढवळे, गिरीश बांगर आदी शेतकरी या वेळी उपस्थित होते. यापुढे येडगाव परिसरातील एकाही शेतकर्याचे कृषी पंपाचे वीजजोड तोडणार नाहीत, याची हमी संबंधित अधिकारी देत नाही; तोपर्यंत आम्ही येथून उठणार नाही, असा पवित्रा आंदोलनकर्त्या शेतकर्यांनी घेतला. 'जय जवान जय किसान' तसेच 'कोण म्हणतो न्याय देत नाही, न्याय घेतल्याशिवाय आम्ही राहात नाही,' अशा घोषणा देण्यात आल्या. शेतकर्यांचा आक्रोश पाहून कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर हे आंदोलनस्थळी आले. त्यांनी शेतकर्यांचे प्रश्न समजून घेतले. यापुढे कृषी पंपाचे वीजजोड तोडायचे झाल्यास आपल्याला पूर्वकल्पना देता येईल, एखादी आपत्कालीन वेळ आली तर तशी पूर्वकल्पना देण्यात येईल. आपण आंदोलन थांबवावे अशी विनंतीदेखील केली. त्यावर शेतकर्यांनी आंदोलन थांबविले.

मुखईने घरातल्या माणसाप्रमाणे जपले : आढळराव पाटील

नारायणगाव । प्रतिनिधी

मुखई गावाशी माझे जुने ऋणानुबंध राहिले आहेत. या गावासाठी कामे करताना मी कधीच मागे-पुढे पाहिले नाही. येथील बैलगाडा घाटाला निधी दिला. खरेतर तुमच्या गावाने मला घरातल्या माणसाप्रमाणे जपले आहे, असे प्रतिपादन शिरूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मुखई येथे केले. महायुतीच्या शिरूर मतदारसंघातील प्रचारार्थ आयोजित दौर्यानिमित्त ते मुखई येथे आले होते. त्या वेळी त्यांनी मुखईचे ग्रामदैवत काळभैरवनाथाचे दर्शन घेतले. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि तरुणाईचा त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या वेळी माजी आमदार पोपटराव गावडे, भाजप नेत्या जयश्रीताई पलांडे, भीमाशंकर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य सचिव आबासाहेब पर्हाड, बाजार समितीचे सभापती प्रकाश पवार, आंबेगाव-शिरूर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अनिल काशीद, शिरूरचे शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ सासवडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरुण गिरे, भाजप शिरूरचे उपाध्यक्ष भगवानराव शेळके, जिल्हा चिटणीस वैभव ढोकले, गावातील प्रतिष्ठित मान्यवर अॅड. सुरेश पलांडे, सतीश पलांडे, माजी सरपंच अतुल धुमाळ, सुदाम थोरवे, सचिन पलांडे, सुरेश पलांडे, विजयराव येवले, दादासाहेब धुमाळ, बूथप्रमुख प्रशांत पलांडे, योगेश पलांडे, अमोल थोरवे यांच्यासह महायुतीतील घटकपक्षांचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते. धामारी, करंदी, जातेगाव, मुखई, हिवरे, खैरेवाडी, खैरेनगर, पाबळ येथे सर्वच ठिकाणी आढळराव पाटील यांच्या प्रचार दौर्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

दिराच्या मदतीने पतीचा खून; पत्नीसह दिराला पोलिसांकडून अटक

आळंदी । प्रतिनिधी

दिराच्या मदतीने पतीच्या डोक्यात हत्याराने मारून त्याचा पत्नीने निर्घृण खून केला. त्यानंतर खुनाचा पुरावा नष्ट करून पतीने आत्महत्या केल्याचा बनाव केला. मात्र, हा बनाव उघड करीत आळंदी पोलिसांनी पत्नी आणि तिच्या दिराला अटक केली. चर्होली येथील थोरवेवस्तीत रविवारी (दि. २८) मध्यरात्री पावणेबारा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. हुजूर महंमूद सय्यद (वय ३२, रा. थोरवेवस्ती, चर्होली) असे खून झालेल्या पतीचे नाव आहे. सय्यद यांची २८ वर्षीय पत्नी आणि तिचा दीर फिरोज महंमूद सय्यद (वय ३८, रा. मासाला खुर्द, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) या दोघांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक अनिल लोहार यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, थोरवेवस्तीत एका व्यक्तीने आत्महत्या केल्याबाबत आळंदी पोलिसांना रविवारी मध्यरात्री माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी हुजूर सय्यद यांच्या घरी जात पाहणी केली. या वेळी हुजूर हे मृतावस्थेत होते. त्यांनी घरात भिंतीला धडक घेऊन आत्महत्या केल्याचे त्यांच्या पत्नीने पोलिसांना सांगितले. मात्र, पोलिसांना संशय आल्याने त्यांनी खुनाच्या अनुषंगाने चौकशी केली. हुजूर यांना झालेली जखम, घटनास्थळावरील परिस्थिती आणि त्यांच्या मुलीने दिलेली माहिती ही हुजूर यांच्या पत्नीने दिलेल्या माहितीशी सुसंगत नव्हती. तसेच पत्नीने घरातील रक्ताचे डाग साफ केले होते. त्यामुळे पोलिसांनी कसून चौकशी केली असता हुजूर यांची पत्नी आणि दीर फिरोज या दोघांनी मिळून त्यांचा खून करून हत्याराची विल्हेवाट लावल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यानुसार पोलिसांनी पत्नी आणि फिरोजला अटक केली.

वरवंडच्या व्हिक्टोरिया तलावात आवर्तन सुरु; २०० क्युसेकने पाण्याचा विसर्ग

दौंड । प्रतिनिधी

दौंड तालुक्यातील वरवंड येथील व्हिक्टोरिया तलावात खडकवासला धरणसाखळीतून कालव्याद्वारे पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. तलावावर अवलंबून असणार्या गावांना मोठा दिलासा मिळाला आहे. उन्हाळ्याच्या कालावधीत व्हिक्टोरिया तलाव पूर्णतः आटला होता. परिणामी, या भागातील पाणी योजना बंद पडल्या. व्हिक्टोरिया तलावावर अवलंबून असणार्या दौंड तालुक्यातील कुसेगाव, पडवी, खोर, नारायणबेट, देऊळगावगाडा, वरवंड, कडेठाण, कानगाव तसेच गिरीम व पाटस हद्दीतील गावांना याचा मोठा फटका बसला.

पाण्यासाठी पंचायत समितीकडून ग्रामीण भागाला टँकर सुरू करण्याची वेळ आली आहे. मागील आठवड्यात पाण्याची समस्या गंभीर बनल्याने वरवंड ग्रामपंचायतीने आंदोलन करीत खडकवासला कालव्याचे पाणी तलावात सोडले. हा पाणी प्रश्न पेटल्यावर याची दखल पाटबंधारे विभागाने घेत वरवंडच्या तलावात पाणी सोडण्याच्या हालचाली सुरू झाल्या.